कायदेविषयक मार्गदर्शन मोफत
संपर्क अॅड. सुशीला
मो नं 8766507294

RNI NO. MAHMAR/2020/84035

BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ

बुधवार, २२ एप्रिल २०२६ | वर्ष : ६ | अंक : ११२ | दैनिक | किंमत : ₹५/-

Wednesday, 22 April 2026 | Year : 6 | Issue : 112 | Daily | Rate: Rs. 5/-

**दि. २२ एप्रिल 2026**



1933- नालासोपारा, वसई येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भाषण.
1947- सरदार पटेल यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी असे सुचविले की, आर्थिक नियोजनासाठी एक स्वतंत्र समिती नेमावी.
संकलन प्रा. यशवंत दुपटे

## महत्त्वाच्या बातम्या

### मणिपूरमध्ये 5.2 तीव्रतेच्या भूकंपाचा धक्का

**नवी दिल्ली :** मंगळवारी सकाळी मणिपूरमध्ये भूकंप झाल्याने रहिवाशांमध्ये घबराट पसरली. राष्ट्रीय भूकंपशास्त्र केंद्राच्या माहितीनुसार, पहाटे 5:50 च्या सुमारास 5.2 तीव्रतेचा भूकंप झाला. याचे केंद्र कामजोंग येथे होते आणि तो जमिनीखाली सुमारे 62 किलोमीटरवर झाला, ज्यामुळे हा मध्यम खोलीचा भूकंप ठरला. भूकंपाचे धक्के इतके जोरदार होते की अनेक जण झोपेतून जागे झाले, मात्र आतापर्यंत कोणतीही मोठी जीवितहानी किंवा मालमत्तेची हानी झाल्याचे वृत्त नाही

### अकोल्यात उष्माघाताचा पहिला बळी ?

**अकोला :** राज्यात उन्हाचा कडाका वाढत असतानाच, अकोल्यातून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. अकोला शहरात एका मालवाहू ऑटोमध्ये अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. या व्यक्तीचा मृत्यू उष्माघातामुळे झाला असावा, असा प्राथमिक संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. विशेष म्हणजे, गेल्या काही दिवसांपासून अकोल्याचे तापमान जागतिक स्तरावर चर्चेचा विषय ठरत आहे. अकोला जिल्ह्यात गेल्या 4 दिवसांपासून सूर्या आग ओकत आहे. मंगळवारी (14 एप्रिल) अकोल्याचे तापमान 44 अंश सेल्सिअस नोंदवण्यात आले, हे जगातील दुसऱ्या क्रमांकाचे सर्वाधिक तापमान ठरले आहे. 10 एप्रिलपासून तापमानात सातत्याने वाढ होत आहे.

### सुरक्षा रक्षक झाला 'डॉक्टर'...

**लखनऊ :** बिहारच्या पश्चिम चंपारणमधील बगहा उपजिल्हा रुग्णालयातून आरोग्य व्यवस्थेचे विदारक वास्तव मांडणारे एक धक्कादायक चित्र समोर आलं आहे. रुग्णालयात अचानक रुग्णांची गर्दी वाढल्यामुळे एका सुरक्षा रक्षकालाच 'डॉक्टर'ची भूमिका बजावावी लागली. अपघातात जखमी झालेल्या एका तरुणाला हा सुरक्षा रक्षक टाके घालत असल्याचा व्हिडीओ समोर आला असून यामध्ये डॉक्टरच्या उपस्थितीतच हा गार्ड उपचार करताना दिसत आहे. हा व्हिडीओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला असून आरोग्य व्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

### मित्रदेशाचा ट्रम्प यांना जोरदार झटका

**नवी दिल्ली :** मध्य पूर्वेत सुरु असलेल्या संघर्षानं या भागातील संपूर्ण राजकारण बदलण्याची शक्यता निर्माण झाली आहे. आखाती देश मागील अनेक वर्षांपासून त्यांच्या संरक्षणासाठी अमेरिकेवर अवलंबून आहे. पण इराण-अमेरिका युद्धात आखाती देशांचे प्रचंड नुकसान झाले. इराणने आखाती देशांवर तीव्र हल्ले चढवले. या हल्ल्यापासून आखाती देशांचे संरक्षण करण्यात अमेरिकेला अपयश आले. त्याचे पडसाद आता उमटू लागले आहेत. अमेरिका आणि यूएई यांच्यातील संबंधाचा पाया इराण युद्धामुळे पूर्णपणे हलला आहे. यूएईचे प्रमुख रणनीतीकार आणि विश्लेषक अब्दुल खालिक अब्दुल्ला यांनी अमेरिकेविरोधात उघड भूमिका घेतली आहे. यूएईला आता आपल्या संरक्षणासाठी अमेरिकेची गरज नाही, असे अब्दुल्ला यांनी जाहीरपणे म्हटले आहे. इराणने गेल्या महिन्याभरात यूएईवर अनेकदा हल्ले केले आहेत. आखाती देशांपैकी सर्वाधिक हल्ले इराणने यूएईवरच केले आहेत. त्यानंतर आता यूएईच्या भूमीवरील अमेरिकेचे सैन्य तळ हटवण्याची मागणी जोर धरु लागली आहे. अमेरिका-यूएई यांचे संबंध 5 दशकांपासूनचे आहेत. पण इराण युद्धाने संबंध बिघडले आहेत.



## केरळयेथील फटाक्यांच्या कारखान्याला आग

### स्फोटात 13 जणांचा मृत्यू

**त्रिशूर :** मंगळवारी केरळच्या त्रिशूर जिल्ह्यातील मुंडाथिक्कोडू परिसरात फटाके बनवण्याच्या कारखान्यात झालेल्या भीषण स्फोटात 13 जणांचा मृत्यू झाला आणि अनेक जण जखमी झाले. शहरात होणाऱ्या वार्षिक हिंदू मंदिर उत्सव, त्रिशूर पूरमची तयारी सुरू असतानाच हा अपघात घडला. प्रधानमंत्री मोदींनी या घटनेबद्दल दुःख व्यक्त केले. सूत्रांनुसार, घटनास्थळी मोठ्या प्रमाणात स्फोटक पदार्थ साठवण्यात आले होते, ज्याला आग लागली आणि नंतर स्फोट झाला. प्राथमिक अहवालानुसार, अंदाजे 40 जण जखमी झाले असून, त्यापैकी किमान आठ जणांची प्रकृती गंभीर आहे. घटनेनंतर लगेचच रुग्णवाहिका घटनास्थळी दाखल झाल्या आणि प्रशासनाने त्रिशूर मेडिकल कॉलेजसह जवळपासच्या रुग्णालयांना कोणतीही आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी सतर्क राहण्याचे निर्देश दिले. स्फोटाचा आवाज अनेक किलोमीटर दूरपर्यंत ऐकू आला. स्फोटानंतर परिसरात दाट धूर आणि आग पसरली, ज्यामुळे बचावकार्यातही अडथळा निर्माण झाला. घटनास्थळी अर्धवट जळालेली आणि न फुटलेली स्फोटके असल्याने मदत आणि बचाव कार्यात अडथळा आला. पोलीस आणि आपत्कालीन सेवांची पथके घटनास्थळी पोहोचली आणि त्यांनी परिस्थिती नियंत्रणात आणण्यास सुरुवात केली. स्फोट इतका शक्तिशाली होता की त्याचा आवाज अनेक किलोमीटर दूरपर्यंत ऐकू आला, यावरून स्फोटाची तीव्रता आणि तेथे असलेल्या स्फोटक पदार्थांच्या प्रमाणाचा अंदाज येतो. अग्निशमन दल आणि पोलिसांची पथके अजूनही घटनास्थळी मदत आणि बचाव कार्य करत असून परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न करत आहेत. परिसर पूर्णपणे सील करण्यात आला असून प्रशासनाने जनतेला सुरक्षित राहण्याचे आवाहन केले आहे. पुढील सूचना मिळेपर्यंत घटनास्थळाजवळ जाऊ नका. वरिष्ठ जिल्हा अधिकारी परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत, तर वैद्यकीय पथके जखमींवर तातडीने उपचार करत आहेत.

**अपघाताच्या वेळी सुमारे 40 लोक काम करत होते...**

घटनास्थळी पोहोचलेल्या राज्य सरकारच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, आयोजकांनी कामगारांसाठी जेवण आणले होते, त्यामुळे स्फोटाच्या वेळी युनिटमध्ये सुमारे 40 लोक काम करत होते. तेथून सात जण सुखरूप बाहेर पडण्यात यशस्वी झाल्याची माहिती आम्हाला मिळाली आहे, असे त्या अधिकाऱ्याने सांगितले. त्रिशूर पूरमच्या थिरुवांबडी समूहासाठी फटाक्यांचे नमुने तयार केले जात असलेल्या फटाक्यांच्या युनिटमध्ये हा स्फोट झाल्याचे सांगितले जात आहे. या घटनेत आतापर्यंत 13 जणांचा मृत्यू झाला असून 5 जणांची प्रकृती अत्यंत गंभीर असल्याचे सांगण्यात येत आहे.



## पश्चिम आशियातील संघर्षामुळे महागाई वाढणार?

**नवी दिल्ली :** पश्चिम आशियातील वाढत्या भू-राजकीय तणावाच्या पार्श्वभूमीवर भारतीय रिझर्व्ह बँके 'वेट अँड वॉच' या भूमिकेत असल्याचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी स्पष्ट केले आहे. अमेरिकेतील प्रिन्स्टन विद्यापीठात एका कार्यक्रमात बोलतांना गव्हर्नर मल्होत्रा यांनी सांगितले की, पश्चिम आशियातील संघर्षामुळे महागाईवर दुय्यम परिणाम होऊ शकतात. त्यामुळे धोरणात्मक निर्णय घेताना सावध भूमिका आवश्यक आहे. मल्होत्रा यांनी नमूद केले की, पश्चिम आशियाशी भारताचे आर्थिक संबंध मोठ्या प्रमाणावर आहेत. भारताच्या एकूण निर्यातीपैकी सुमारे 1/6 हिस्सा आणि आयातीपैकी सुमारे 1/5 हिस्सा या भागाशी संबंधित आहे. याशिवाय, कच्च्या तेलाच्या आयातीपैकी जवळपास 50टक्के आणि खतांच्या आयातीपैकी सुमारे 2/5 हिस्सादेखील याच भागातून येतो. या कारणांमुळे या प्रदेशातील तणावाचा भारतावर थेट परिणाम होऊ शकतो.



मल्होत्रा पुढे म्हणाले की, जर पुरवठा साखळीतील अडथळे दीर्घकाळ टिकले, तर सुरुवातीचा पुरवठा धक्का पुढे जाऊन सर्वसाधारण किमतींमध्ये कायमस्वरूपी वाढ करू शकतो. महागाई अपेक्षांवर नियंत्रण ठेवणे हेच चलनविषयक धोरणाचे मुख्य उद्दिष्ट असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. मल्होत्रा यांनी यावेळी असेही सांगितले की, भारताची वित्तीय प्रणाली मजबूत आणि स्थिर आहे. Insolvency and Bankruptcy Code (IBC), बँकिंग सुधारणा आणि जागतिक मानकांशी सुसंगत नियम यामुळे प्रणाली अधिक सक्षम झाली आहे. nified Payments Interface (UPI) च्या यशानंतर RBI आता 'युनिफाइड लेंडिंग इंटरफेस' (ULI) विकसित करत आहे. यामुळे शेतकरी आणि लघुउद्योगांना काही मिनिटांत कर्ज पात्रता तपासणे शक्य होईल.

## सिलिंडरसाठी रांगेत असताना माजी सरपंचाचा मृत्यू



**अकोला :** गॅस वितरण व्यवस्थेतील गोंधळ आणि वाढत्या टंचाईच्या पार्श्वभूमीवर अकोला जिल्ह्यात एक धक्कादायक घटना घडली आहे. सिलिंडर मिळविण्यासाठी रांगेत उभे असताना अकोला तालुक्यातील अन्वी मिर्झापूरचे माजी सरपंच असलेले शंकरराव सिरसाट यांचा शनिवारी (दि. 28) दुपारी मृत्यू झाल्याने प्रशासनाच्या दाव्यांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. अन्वी मिर्झापूर येथील माजी सरपंच शंकरराव शिरसाट हे यदुराज गॅस एजन्सीसमोर सिलिंडर मिळविण्यासाठी रांगेत उभे होते. यावेळी त्यांना अचानक चक्कर येऊन ते खाली कोसळले. उपस्थितांनी तत्काळ मदत करण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यांचा जागीच मृत्यू झाला. सरकारकडून गॅसटंचाई नसल्याचे दावे केले जात असले तरी प्रत्यक्षात वितरण व्यवस्थेत मोठा गोंधळ असल्याचे चित्र आहे. अफवा, वाढती मागणी आणि अपुरा पुरवठा यामुळे ग्राहकांमध्ये अस्वस्थता वाढत आहे. 14 किलोच्या सिलिंडरऐवजी कमी प्रमाणात गॅस मिळत असल्याच्या तक्रारीही नागरिकांकडून केल्या जात आहेत. या सर्व परिस्थितीत सर्वाधिक फटका सामान्य नागरिकांना बसत आहे. या घटनेवर प्रतिक्रिया देताना वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष अॅड. प्रकाश आंबेडकर यांनी शासनाच्या नियोजनशून्यतेवर टीका केली आहे. गॅस सिलिंडरचा तुटवडा होणार असल्याची पूर्वसूचना देण्यात आली होती.

## 'अद्रक के पंजे' चे निर्माते बब्बन खान यांचे निधन

**नागपूर :** 'अद्रक के पंजे'चे निर्माते हैदराबादचे ज्येष्ठ नाटककार बब्बन खान यांचे निधन निधन 17 एप्रिल 2026 (शुक्रवार) रोजी रात्री 8 वाजता झाले.हैदराबाद येथे झाले आहे. त्यांच्या निधनाने संपूर्ण हैदराबादवर शोककळा पसरली आहे. ते 83 वर्षांचे होते. आठवड्याभरापासून त्यांची प्रकृती गंभीर असल्याने ते आयसीयू मध्ये होते.



'अद्रक के पंजे' हे त्यांचे एकपात्री नाटक 1965 पासून सुरू झाले होते, ज्याने गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये स्थान मिळवले होते. त्यांच्या पश्चात पत्नी शैला खान आणि दोन मुली असा परिवार आहे. गतशतकाच्या अखेरच्या दशकांमध्ये, त्यांच्या रंगमंचीय प्रयोगांनी इतकी प्रचंड लोकप्रियता मिळवली होती की, त्यांची नोंद चक्क 'गिनीज बुक ऑफ रेकॉर्ड्स'मध्येही घेतली गेलीहोती. हैदराबादी विनोदाने नटलेल्या या मालिकेतून एका कनिष्ठ-मध्यमवर्गीय कुटुंबाची हताशा, त्यांची बिकट अवस्था आणि त्यांची मानसिक स्थिती यांचे चित्रण केले होते. कुटुंबाचे प्रमुख असलेले 'रामूसू' हे, दैनंदिन जीवनातील कटकटींमुळे सतत हैराण झालेले असत; तसेच आपल्या गरिबीमुळे आणि कुटुंबातील बेबंदपणामुळे ते नेहमीच कर्जाच्या विळख्यात अडकलेले असत. हळूहळू, हैदराबादमधून सुरू झालेल्या या नाटकाने देशभरातील अनेक शहरांचा दौरा केला आणि परदेशातील शहरांमध्येही मोठी खळबळ उडवून दिली. तोपर्यंत, या नाटकाचे 10,000 हून अधिक प्रयोग पूर्ण झाले होते. 'स्टँड-अप कॉमेडी'ची लाट येण्यापूर्वीच, बब्बन खान यांनी घरगुती आणि कौटुंबिक विनोदांचा असा काही खजिना सादर केला होता की, तो पाहून प्रेक्षक हसून हसून बेभान होऊन जात असत.बब्बन खान यांच्या प्रतिभेला मानाचा मुजरा!

## नरेंद्र मोदी हे दहशतवादी... : काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे



**नवी दिल्ली :** विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदींवर टीका केली आहे. चेन्नईत आयोजित पत्रकार परिषदेत खर्गे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना दहशतवादी असे संबोधले आहे. यामुळे मतदान तोंडावर आल्यानंतर देशात मोठा वाद उफाळून येणार आहे. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे म्हणाले की, "AIADMK मोदींशी हातमिळवणी कशी करू शकतात? ते एक दहशतवादी आहेत. आणि ते असे व्यक्ती आहेत ज्यांचा समानतेवर विश्वास नाही. त्यांच्या पक्षाचाही समानता आणि न्यायावर विश्वास नाही. आणि हे लोक त्यांच्याशी हातमिळवणी करत आहेत. AIADMK लोकशाही कमकुवत करत असून ते पेरियार आणि आंबेडकरांच्या विचारांच्या विरोधात काम करत आहेत" मात्र, काही वेळातच खड़गे यांनी यावर स्पष्टीकरण देऊन आपली बाजू सावरण्याचा प्रयत्न केला. खर्गे पुढे म्हणाले की, 'प्रधानमंत्री मोदी हे लोकांना आतंकित करत आहेत. आयटी, ईडी आणि इतर स्वायत्त संस्थांचा वापर करून ते विरोधकांना आणि सर्वसामान्यांना धमकावत आहेत. मी केवळ हे स्पष्ट करत होतो की ते हुकूमशाही पद्धतीने काम करत आहेत.'

## वेठबिगारी आणि बाल तस्करीच्या जाळ्याविरोधात सर्वोच्च न्यायालयाने घेतली कडक भूमिका

**नवी दिल्ली :** देशभरात पसरत असलेल्या आंतरराज्यीय वेठबिगारी आणि बाल तस्करीच्या जाळ्याविरोधात देशाच्या सर्वोच्च न्यायालयाने कडक भूमिका घेतली आहे. मंगळवारी, सर्वोच्च न्यायालयाने केंद्रीय कामगार आणि रोजगार मंत्रालयाच्या सचिवांना व्यक्तिशः प्रतिज्ञापत्र दाखल करण्याचे आदेश दिले. ही समस्या मुळापासून नष्ट करण्यासाठी सरकारने आतापर्यंत कोणती पावले उचलली आहेत, असा स्पष्ट प्रश्न न्यायालयाने विचारला. सुनावणीदरम्यान, ज्येष्ठ वकील एच. एस. फूलका यांनी धक्कादायक आकडेवारी सादर केली. त्यांनी सांगितले की, विविध राज्यांमधून अंदाजे 11,000 मुलांची सुटका करण्यात आली. मात्र, धक्कादायक बाब म्हणजे, त्यापैकी केवळ 971 मुलांनाच तात्काळ आर्थिक मदत मिळाली. उर्वरित मुले अजूनही सरकारी मदतीची वाट पाहत आहेत. सुटका झालेल्या मुलांना तात्काळ मदत पुरवणे ही सर्वात मोठी समस्या आहे, असे सर्वोच्च न्यायालयाने नमूद केले.



**केवळ अहवाल नको, आम्हाला उपाय हवा : सर्वोच्च न्यायालय**

न्या. विक्रम नाथ आणि न्या. संदीप मेहता यांच्या खंडपीठाने, प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन म्हटले की, मंत्रालयाने केवळ आपल्या कारवाईचा तपशीलच देऊ नये, तर ही समस्या मुळापासून नष्ट करण्यासाठी न्यायालयाकडून आणखी कोणत्या मार्गदर्शक सूचनांची आवश्यकता आहे, हे देखील स्पष्ट करावे. वेठबिगार आणि मानवी तस्करीच्या मूलभूत हक्कांच्या उल्लंघनाचा मुद्दा उपस्थित करणाऱ्या याचिकांवर ही सुनावणी होत आहे.

## देशाच्या औद्योगिक आणि तांत्रिक विकासामध्ये डॉ. आंबेडकरांचे मौलिक योगदान : डॉ. प्रदीप आगलावे

**लोणेरे (जिल्हा रायगड) :** महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे व्यक्तिमत्व हे अष्टपैलू होते. त्यांनी भारताच्या जलधोरण आणि विद्युत धोरणाच्या संदर्भात अतिशय मौलिक योगदान दिले. त्यामुळे आधुनिक भारतात मोठमोठी धरणे बांधण्यात आलीत. विद्युत स्वस्त आणि मुबलक उपलब्ध झाली; परिणामतः देशाचा औद्योगिक विकास झाला. एकंदरीत आधुनिक विकसित भारताच्या औद्योगिक आणि तांत्रिक विकासामध्ये डॉ. आंबेडकरांचे मौलिक योगदान आहे. असे विचार प्रसिद्ध साहित्यिक आणि विचारवंत डॉ. प्रदीप आगलावे यांनी मांडले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ, लोणेरे (जिल्हा रायगड) येथे आंबेडकर जयंतीच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात डॉ. प्रदीप आगलावे हे बोलत होते. पुढे ते म्हणाले कि, डॉ. आंबेडकर हे 1942 ते 1946 च्या काळात भारताचे मंत्री होते. त्यांच्याकडे मजूर, जल, विद्युत इत्यादी अनेक खाती होती. त्यांनी भारताचे जल आणि विद्युत धोरण ठरविताना बहुउद्देशीय प्रकल्प तयार केलेत. स्वातंत्र्यानंतर देशाने त्यांच्या जल आणि विद्युत धोरणाची अंमलबजावणी केली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अधिष्ठाता डॉ. विकास सरगडे हे होते. यावेळी अधिष्ठाता डॉ. एस.एल. नलबलवार, डॉ. चंद्रकुमार बडोले, डॉ. अशोक पवार इत्यादी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. धनराज वाघमारे यांनी केले. डॉ. गणेश वरखेडे पाहुण्यांचा परिचय करून दिला तर कार्यक्रमाचे संचालन डॉ. माधुरी भगत यांनी केले. विद्यार्थ्यांनी डॉ. आंबेडकरांच्या जीवनातील प्रसंगावर आधारित अतिशय प्रभावी अशी प्रदर्शनी तयार केली होती.




## लंडनमध्ये आंतरराष्ट्रीय डॉ. बाबासाहेब आंबेडकर परिषद

**नागपुरातून 12 प्रतिनिधी रवाना**



**नागपूर :** संथागार फाउंडेशन, नागपूर येथे 18 एप्रिल 2026 रोजी झालेल्या बैठकीत आंतरराष्ट्रीय डॉ. बाबासाहेब आंबेडकर परिषद 30 एप्रिल 2026 रोजी युनिव्हर्सिटी ऑफ आक्सफर्ड, लंडन येथे आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती समन्वयक डॉ. वीणा राऊत यांनी दिली. ही परिषद फुले-शाहू-आंबेडकर विचार प्रसारक मंडळ, भोर, संथागार फाउंडेशन, नागपूर आणि प्रबुद्ध आंतरराष्ट्रीय संस्था, लंडन यांच्या संयुक्त विद्यमाने होणार आहे. मुख्य आयोजक डॉ. एम.एस. जांभुळे यांनी सांगितले की, परिषद अध्यक्ष म्हणून डॉ. शरद गायकवाड कार्यभार सांभाळणार असून आयु. एम.एस. बहेल आणि डॉ. श्रीकांत बोरकर मार्गदर्शन करणार आहेत. परिषदेत प्राध्यापकांकडून संशोधन पेपर सादर केले जातील. तसेच डॉ. एम.एस. जांभुळे लिखित व डॉ. वीणा राऊत दिग्दर्शित 'सिम्बॉल ऑफ नॉलेज - डॉ. बाबासाहेब आंबेडकर' हे लघुनाट्य सादर होणार आहे. या परिषदेत लंडनमधील भारतीय तसेच इंग्लंडमधील प्राध्यापक सहभागी होणार आहेत. 22 एप्रिल ते 2 मे 2026 या कालावधीत होणाऱ्या दौऱ्यात लंडन येथील डॉ. आंबेडकरांनी शिक्षण घेतलेल्या संस्था, आंबेडकर आंतरराष्ट्रीय भवन, बुद्ध विहार तसेच स्कॉटलंड येथील प्रेक्षणीय स्थळांना भेट दिली जाणार आहे. या दौऱ्याचे आयोजन सिद्धार्थ प्रबुद्ध (फलटण) यांनी केले आहे. नागपूरहून या दौऱ्यात डॉ. एम.एस. जांभुळे, मंगला जांभुळे, डॉ. वीणा राऊत, अमर नारनवरे, डॉ. सुनंदा जुलमे, सुनीता रामटेके, रत्ना मुन, रत्नदीपा कांबळे, रिटा नाईक, सुरेखा ताकसांडे, मेघराज वानखेडे आणि अनिता वानखेडे सहभागी होत आहेत. प्रतिनिधी मंडळ 22 एप्रिल 2026 रोजी लंडनकडे प्रयाण करीत आहे, अशी माहिती डॉ. एम.एस. जांभुळे व डॉ. वीणा राऊत नारनवरे यांनी दिली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संयुक्त नागरी जयंती समारोह - २०२६
वर्ष १२
रविवार, २६-०४-२०२६ समय : शाम ६.०० बजे
स्थान - डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंटरनॅशनल कन्व्हेन्शन सेंटर, कामठी रोड, नागपूर
प्रबोधन कार्यक्रम का विषय "राष्ट्रनिर्माण के लिये डॉ. बाबासाहेब आंबेडकर का योगदान"
अध्यक्ष मा. डॉ. नितीन राऊत माजी मंत्री व सदस्य, महाराष्ट्र विधानसभा, नागपुर.
मुख्य वक्ता आयु. निरंजन टकले नाशिक (वरिष्ठ पत्रकार, वक्ता और सुप्रसिद्ध विचारवंत)
विषय : "आधुनिक भारत के निर्माण में डॉ. बाबासाहेब आंबेडकर का योगदान"
आयोजक डॉ. बाबासाहेब आंबेडकर नागरी समिती, नागपुर.
शुभेच्छुक
• डॉ. शाजिया खान
नागपुर
शिक्षाविद, मार्गदर्शक और परिवर्तनकर्ता तथा सामाजिक कार्यकर्ता
• आयु. आर. डी. आत्राम
नागपुर
सेवानिवृत्त, सहआयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, तथा अध्यक्ष, गोंडवाना ट्रायबल फाउंडेशन

बहुजन सौरभ

# संपादकीय

## जयंती : विचार आणि उत्सव

भारतातील सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक जीवनात 14 एप्रिल हा दिवस अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. हा दिवस म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती. देशभरात हा दिवस उत्साह, अभिमान आणि प्रेरणेने साजरा केला जातो. मात्र, गेल्या काही वर्षांत एक वाक्य वारंवार ऐकायला मिळते, 'वर्षभर वाचतो, एक दिवस नाचतो.' या वाक्याच्या माध्यमातून आंबेडकरी चळवळीतील बदलते प्रवाह आणि उच्च शिक्षित तरुणांची मानसिकता स्पष्ट होते. 'वर्षभर वाचतो' म्हणजे केवळ पुस्तक वाचन नव्हे, तर विचारांचा, तत्त्वज्ञानाचा आणि सामाजिक वास्तवाचा सखोल अभ्यास होय. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला 'शिका, संघटित व्हा, संघर्ष करा' हा संदेश आजही विद्यार्थ्यांच्या जीवनाचा पाया आहे. उच्च शिक्षित विद्यार्थी आज संविधान, अर्थशास्त्र, समाजशास्त्र आणि कायदा या क्षेत्रांत प्रावीण्य मिळवत आहेत. ते डॉ. बाबासाहेबांचे लेखन, भाषणे आणि विचार यांचा अभ्यास करून स्वतःला घडवत आहेत. दुसरीकडे, 'एक दिवस नाचतो' ही अभिव्यक्ती अनेकदा टीकेचा विषय बनते. काहींच्या मते, जयंतीच्या दिवशी डीजे, ढोल-ताशे आणि नृत्य यामुळे मूळ विचार बाजूला पडतात. परंतु, उच्च शिक्षित विद्यार्थ्यांचा दृष्टिकोन वेगळा आहे. त्यांच्या मते, हा नाच केवळ करमणूक नसून, तो आनंद, अभिमान आणि सामाजिक ओळखीचा उत्सव आहे. आजचा विद्यार्थी केवळ पदवीधर नाही, तर तो विचारशील, जागरूक आणि सामाजिक जबाबदारी जाणणारा आहे. तो म्हणतो, 'आम्ही वर्षभर डॉ. बाबासाहेबांचे विचार वाचतो, त्यांचा अभ्यास करतो. एक दिवस नाचतो, कारण हा आमच्या आत्मसन्मानाचा उत्सव आहे.' ही भूमिका केवळ भावनिक नसून तर्कसंगत आहे. कारण शिक्षण आणि आनंद हे परस्परविरोधी नाहीत; उलट, ते एकमेकांना पूरक आहेत. जयंतीच्या दिवशी नाचणे म्हणजे विचार विसरणे नव्हे, तर त्या विचारांचा विजय साजरा करणे होय. पूर्वी जयंती साधेपणाने साजरी केली जात होती. वाचन, व्याख्याने, मिरवणुका आणि सामाजिक उपक्रम. आज त्यात डीजे, लाईटिंग आणि सोशल मीडियाचा समावेश झाला आहे. काहींना हा बदल खटकतो, तर काहींना तो आधुनिकतेचा भाग वाटतो. उच्च शिक्षित विद्यार्थी या बदलाकडे संतुलित दृष्टिकोनातून पाहतात. ते म्हणतात की, जयंतीत विचारप्रधान कार्यक्रम हवेत, पण उत्सवही हवा, कारण तो लोकांना जोडतो. केवळ नाच नव्हे, तर समाजकार्यही आवश्यक आहे. 'नाचतो' या शब्दाचा अर्थ केवळ शारीरिक हालचाल नाही; तो आनंद, स्वातंत्र्य आणि आत्मविश्वासाचे प्रतीक आहे. जे लोक शतकानुशतके दडपले गेले, त्यांच्यासाठी नाचणे म्हणजे स्वतःची ओळख स्वीकारणे होय. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या समतेच्या लढ्याचा हा एक परिणाम आहे. आज विद्यार्थी निर्भयपणे रस्त्यावर उतरून आपला आनंद व्यक्त करतात. हा आनंद त्यांच्या संघर्षाच्या यशाचा उत्सव आहे. निश्चितच, काही ठिकाणी अतिरेकही दिसून येतो. दारू पिणे, गोंधळ घालणे, विचार विसरणे. यामुळे जयंतीच्या मूळ उद्देशाला धक्का बसतो. उच्च शिक्षित विद्यार्थी या बाबतीत सजग आहेत. ते स्पष्टपणे सांगतात, 'नाचण्यात काहीही चुकीचे नाही; पण ते सन्मानपूर्वक आणि मर्यादेत असावे. डॉ. बाबासाहेबांचा अपमान होईल असे काहीही करणे योग्य नाही.' आज सोशल मीडियामुळे जयंतीचे स्वरूप अधिक व्यापक झाले आहे. फेसबुक, व्हॉट्सॲप आणि इंस्टाग्रामवर पोस्ट, व्हिडिओ आणि स्टेटस यांच्या माध्यमातून विचारांचा प्रसार होतो. उच्च शिक्षित विद्यार्थी या माध्यमांचा योग्य वापर करत आहेत. ते डॉ. बाबासाहेबांचे विचार, संविधानाची माहिती आणि सामाजिक संदेश यांचा प्रसार करत आहेत. त्यामुळे 'वर्षभर वाचतो' ही संकल्पना केवळ वैयक्तिक न राहता सामाजिक बनते. उच्च शिक्षित विद्यार्थ्यांसाठी जयंती म्हणजे केवळ उत्सव नाही, तर जबाबदारीही आहे. ते विविध उपक्रम राबवतात, रक्तदान शिबिरे, पुस्तक वाटप, गरीब विद्यार्थ्यांना मदत, तसेच व्याख्याने. हे उपक्रम दर्शवतात की 'वर्षभर वाचतो' हा केवळ शब्द नसून कृती आहे. आजच्या काळात 'वाचन' आणि 'नृत्य' यांच्यात समतोल साधणे गरजेचे आहे. केवळ वाचनाने समाज बदलत नाही आणि केवळ नाचल्याने विचार टिकत नाहीत. दोन्हींचा समन्वय आवश्यक आहे. उच्च शिक्षित विद्यार्थी हा समतोल साधण्याचा प्रयत्न करत आहेत. ते म्हणतात, 'आम्ही विचारही जपू आणि उत्सवही साजरा करू.' 'वर्षभर वाचतो, एक दिवस नाचतो' हे वाक्य वरवर पाहता विरोधाभासी वाटते. पण त्यामागे सखोल अर्थ दडलेला आहे. हे वाक्य म्हणजे शिक्षण आणि आनंद, विचार आणि उत्सव, संघर्ष आणि विजय यांचा संगम आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती ही केवळ एका दिवसाची कार्यक्रम नाही, तर ती एक विचारसरणी आहे. उच्च शिक्षित विद्यार्थी या विचारसरणीला समजून घेत आहेत, जगत आहेत आणि पुढे नेत आहेत. म्हणूनच, 'वर्षभर वाचतो' हे त्यांचे कर्तव्य आहे आणि 'एक दिवस नाचतो' हा त्यांचा हक्क आहे. या दोन्हींच्या समन्वयातूनच एक प्रबुद्ध, जागरूक आणि समतावादी समाज निर्माण होऊ शकतो. ■ ■

# दृष्टिकोन सकारात्मक पाहिजे !

**'अनुसूचित जाती, अती मागास जातींच्या सर्वसमावेशक, शाश्वत, प्रगतिशील विकासासाठी राज्य सरकारने बजेट चा कायदा अंमलात आणावा ..' शैक्षणिक व सामाजिक दृष्ट्या मागास जाती ओळखून त्यांना एका यादीत घेतले. संसदेची मान्यता व राष्ट्रपती यांचा आदेश असणारी अनुसूचित जातीची यादी. संविधानाच्या अनुच्छेद 341 नुसार ही यादी आहे. आदिवासींसाठी अशीच यादी अनुच्छेद 342 नुसार व ओबीसी साठी अनुच्छेद 340 नुसार यादी आहे.**




या यादीतील सगळेच शैक्षणिक व सामाजिक दृष्ट्या मागास आहेत. त्यामुळे या यादीतील सर्व अनुच्छेद 14, 15, 16, 17, 21 आणि 46 चा लाभ व सवलती, संरक्षण व विविध योजना/प्रोग्राम इत्यादी मिळण्यास पात्र ठरतात. त्यातही काही जाती संविधानिक लाभापासून वंचित राहिल्या आहेत हे नाकारता येत नाही. याची अनेक कारणे आहेत. सर्वच जातीत मागास अतिमागास असतात. तसे अनुसूचित जातीमध्ये अती मागास जाती आहेत. अती मागास जातीचा विकास झालाच पाहिजे. संविधानाच्या अनुच्छेद 46 नुसार राज्य सरकारची ही जबाबदारी आहे. अनुसूचित जाती व जमाती यांना इतरांच्या बरोबरीत आणण्यासाठी केंद्र सरकारने, इंदिरा गांधी प्रधानमंत्री असताना, सहाव्या पंचवार्षिक योजनेपासून (1980-85) लोकसंख्येच्या प्रमाणात बजेटमध्ये आर्थिक तरतूद करण्याचे धोरण अंमलात आणले. अनुसूचित जाती उपयोजना व आदिवासी उपयोजना, वेगवेगळ्या नावाने आजही सुरू आहे. चार दशके झालीत. जातीनिहाय महामंडळे स्थापित झालीत. तरी अती मागास वर्गाला प्रतिनिधित्व मिळाले नाही असे जे सरकार सांगते, त्यास सरकारच जबाबदार आहे. सरकारने जे करायला पाहिजे ते योग्यप्रकारे करीत नाही, असे आजचे चित्र आहे.

**माझे मत**



ई. झेड. खोब्रागडे
9923756900

राजकीय फायदा बाजूला ठेवून सामाजिक व आर्थिक न्याय देण्यासाठी सरकारने काम करण्याची गरज आहे. प्रतिनिधित्वचे नावाने जातींमध्ये विघटन न करता समाज एकसंघ ठेवण्याची जबाबदारीसुद्धा सरकारची आहे. विकास घडवून आणण्याचे अनेक मार्ग आहेत. केवळ आरक्षण हा एकमेव मार्ग नाही. राज्य सरकारने आपली संविधानाने सोपविलेली जबाबदारी नीट पार पाडली असती तर हा विषय चर्चेला आला नसता. अती मागास जातींना आरक्षणाचा फायदा मिळाला नाही. म्हणून जातींचे उपवर्गीकरण करून त्यांना आरक्षणाचा लाभ मिळवून देण्याच्या हेतूने आरक्षण कोटा विभागून देण्याची संपूर्ण प्रक्रिया राज्य सरकार अती जलद गतीने राबवित आहे. यासाठी जी काळजी घ्यायला पाहिजे ती सुद्धा घेतली जात नाही. जनगणना 2026-27 सुरू झाले आहे. यातून आवश्यक तो डाटा मिळवता येतो, मिळवला पाहिजे. सर्वोच्च न्यायालयाचा 1 ऑगस्ट 2024 च्या निर्णयाचा हवाला दिला जातो. खरे तर हा राज्य सरकारांना सल्ला आहे, मत नोंदविले आहे की राज्य सरकार सबळ empirical डाटाचे आधारावर, वाटले तर उपवर्गीकरण करू शकते. महाराष्ट्र सरकार पार्टी ही नव्हते तरीपण सरकारने स्वतःहून पुढाकार घेऊन उपवर्गीकरणाचा विषय पुढे आणला. ज्याप्रकारे हा विषय हाताळला जात आहे. त्यावरून शंका येते की सरकारला हा विषय न्यायालयात पुन्हा अडकवायचा तर नाही? असे झाले तर कोणाला काहीच मिळणार नाही. विनाकारणचा वाद निर्माण करणे बरोबर नाही. कोणाला काहीच मिळू नये असे सरकारला वाटते का? त्यासाठी हा खटाटोप तर नाही, अशी शंका येते. सरकारला असे वाटते की आरक्षण कोटा तुकड्यात दिला. वर्गीकरण करून, की अती मागास पुढे जातील हा भ्रम आहे. आरक्षणाची पदे किती आणि कोणाला काय मिळणार? आरक्षण धोरणाची प्रामाणिकपणे अंमलबजावणी झाली नाही, अनुशेष भरला गेला नाही, कंत्राटी व बाह्यस्रोतने पद भरती झाली आणि होत आहे हे वास्तव दुर्लक्षित करता येणार नाही. सामाजिक न्याय विभागाच्या बार्टी या संस्थेत जवळपास 1100-1200 कर्मचारी यांची भरती कंत्राट पद्धतीने बाह्य स्त्रोतद्वारे करण्यात आली. यात अती मागासवर्गाचे प्रतिनिधित्व किती आहे? याचा अभ्यास करण्याची गरज आहे. बाह्य स्त्रोतद्वारे भरतीमध्ये आरक्षण धोरण का राबविले जात नाही? आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी शिक्षण महत्वाचे आहे. अती मागास जातीमधील प्रत्येक जातीचे शिक्षणातील, उच्च व तंत्र शिक्षणातील प्रमाण किती? माहिती घ्यावी. अती मागास जातींना इतरांच्या बरोबरीत आणण्यासाठी राज्य सरकारने विविध प्रकारे काम करण्याची गरज आहे. संविधानिक जबाबदारी आहे. आरक्षण कोट्याचे तुकडे करणे हा व्यावहारिक मार्ग नाही. अती मागास कोणत्या जाती आहेत आणि आतापर्यंत त्यांना काय मिळाले व काय मिळाले नाही याचा जातनिहाय डाटा, प्रत्येक जातीची लोकसंख्या किती ही माहिती गोळा करावी. जातनिहाय शिक्षण, रोजगार, नोकऱ्या, उपजिविका, सामाजिक व आर्थिक स्थिती काय आहे हे ही अभ्यासावे. जनगणना 26-27 मधूनही माहिती उपलब्ध होऊ शकते. सर्व्हिसेस मधील कॅडर निहाय प्रत्येक जातीचे प्रतिनिधित्व किती ही माहिती सरकारने तयार करावी. या वर्षीचे 2026-27 चे वार्षिक बजेटमध्ये, वित्तमंत्री यांनी सभागृहात स्पीचमध्ये सांगितले की हे बजेट चार स्तंभावर उभे आहे, 1. प्रगतिशील, 2. शाश्वत, 3. सर्वसमावेशक, 4. सुशासन. याच बजेटची आकडेवारी पाहिली तर अनुसूचित जातीच्या विकासासाठी लोकसंख्येचे प्रमाणात 32772 कोटी तरतूद करणे आवश्यक असताना 23150 कोटीची तरतूद केली आहे. 9622 कोटी कमी तरतूद केली. अनुसूचित जातीच्या कल्याणासाठी सरकार कटिबद्ध आहे असे कसे म्हणता येईल. मागील 11-12 वर्षातील बजेट तरतुदी व खर्च याचा आढावा घेतला तर असे लक्षात येते की 2014-15 ते 2026-27 या काळात राज्य सरकारने जवळपास 60 हजार कोटी अनुसूचित जातीसाठी खर्च केले नाही, वंचित ठेवले असे म्हणू. कुठे गेला हा पैसा? सरकारने त्यांचे सत्ताकाळात अती मागाससाठी विशेष असे काय केले? यावर श्वेतपत्रिका काढावी. अनुसूचित जातीमधील अती मागास जातीच्या शिक्षण, रोजगार साठी हा 60 हजार कोटीचा निधी वापरावा, नवीन योजना आणाव्यात. मागासलेपण दूर होण्यास मदत होईल. राज्य सरकारने अनुसूचित जातीमधील प्रमुख जाती लक्षात घेऊन स्वतंत्र महामंडळे स्थापित केलीत. या महामंडळाचे काय केले हे अभ्यासनाची गरज आहे. यावर सुद्धा श्वेतपत्रिका काढावी. BARTI आहे तसे ARTI सुरू केले. अती मागास जातीसाठी अजूनही करावे. बजेट द्यावा, योजना कराव्यात. नोकरीतील आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी सक्षम करावे. याकडे खरेच सरकारचे लक्ष आहे का? प्रशासनाचे अधिकारी, अपवाद वगळता, अती मागासच्या समस्या समजून सुद्धा घेत नाहीत. अती मागासच्या वस्तीत अधिकाऱ्यांना पाठवा, वस्ती दत्तक द्या. 5 वर्ष हा उपक्रम राबवा, काही बदल निश्चित दिसेल. स्वातंत्र्याच्या 78 वर्षात नागपूरच्या रहाटे टोलीतील मांग गारुडी अती मागास समाजातील पहिल्यांदा फक्त चार graduate झालेत. त्यांचा आम्ही सत्कार केला होता. आरक्षण कोट्यातून नोकरी मिळण्यासाठी किमान पात्रता शिक्षणाची आहे. मांग गारुडी भारताचे नागरिक व महाराष्ट्राचे रहिवासी आहेत. तरीपण त्यांना जातीचे दाखले मिळण्यात खूप अडचणी आहेत. याकडे सरकारचे लक्ष वेधले परंतु प्रतिसाद नाही. मागास राहण्याचे कारण, सरकारचे प्रशासनाचे दुर्लक्ष व उदासीनता हे महत्वाचे एक कारण आहे. अती मागास वर्गासाठी सुशासन कुठे आहे? ही फक्त नागपूरची समस्या नाही तर महाराष्ट्रभर आहे. आदिवासी, भटके विमुक्त यांचेही हाल वाईट आहेत. सरकारला अती मागास वर्गाची खरेच चिंता असेल तर त्यांचे मूलभूत गरजा पूर्ण करा, वस्तीमध्ये मूलभूत सुविधा द्या, शिक्षण, आरोग्य, रोजगार, उपजिविका व सुरक्षा सन्मान ची व्यवस्था करा, संवेदनेसह संवाद वाढवा, वस्ती भेट करा, शोषण थांबवा, बदल दिसेल. शोषित वंचितांच्या विकासाचा कार्यक्रम अंमलात आणण्याची खूप गरज आहे. महाराष्ट्र सारख्या पुरोगामी व प्रगत राज्यात उपवर्गीकरण करून आरक्षणाचे टक्केवारीचे तुकडे करण्यापेक्षा कल्याणकारी योजनांवर भर द्यावा व विकास घडवून आणावा. सामाजिक सलोखा कायम ठेवून अती मागास वर्गाना शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक न्याय देता येतो. बजेटचा कायदा करून सरकार आपला हेतू पूर्णत्वास नेऊ शकते. दृष्टिकोन सकारात्मक पाहिजे.· ■ ■

# सामाजिक न्याय की राजकीय प्रयोग ?

**आयोग कायदा 2025 आणि बदर समितीवर थेट प्रश्न**




महाराष्ट्रात सामाजिक न्यायाच्या नावाखाली नेमके काय सुरू आहे, धोरणात्मक सुधारणा की राजकीय प्रयोग? 2025 मध्ये अनुसूचित जाती आयोगाला वैधानिक दर्जा देऊन सरकारने एक मजबूत पाऊल टाकल्याचा दावा केला. पण लगेचच त्याच सरकारने अनुसूचित जातींमध्ये उपवर्गीकरणासाठी बदर समिती नेमली. प्रश्न सरळ आहे, आयोगावर विश्वास नाही का? की अजून काही वेगळेचालले आहे?

वास्तव नाकारून चालणार नाही. अनुसूचित जाती समाजात विषमता आहे, हे खरे आहे. काही जाती पुढे गेल्या, काही मागे राहिल्या ही वस्तुस्थिती आहे. पण त्यावर उपाय म्हणून संविधानाच्या सीमारेषा ओलांडणारे प्रयोग करणे हा उपाय आहे का? की हा केवळ सामाजिक असंतोषाला राजकीय दिशा देण्याचा प्रयत्न आहे?



अरविंद गेडाम
मो.7498564512

अनुच्छेद 341 स्पष्ट आहे अनुसूचित जातींची यादी आणि त्यातील बदल करण्याचा अधिकार राज्य सरकारकडे नाही. तरीही उपवर्गीकरणाचा मुद्दा पुढे आणणे म्हणजे थेट संविधानिक चौकटीला आव्हान देणे नाही का? हा प्रश्न टाळून चालणार नाही.

याहून गंभीर मुद्दा म्हणजे, आयोग अस्तित्वात असताना स्वतंत्र समितीची गरज काय? आयोगाला अर्ध-न्यायिक अधिकार देण्यात आले, त्याला तक्रार निवारण आणि देखरेखीची जबाबदारी देण्यात आली. मग धोरणात्मक प्रश्नांवर त्याचे मत का घेतले जात नाही? की आयोग हा केवळ कागदोपत्री संस्था बनवायची आहे? दरम्यान, वास्तव अधिक कठोर आहे. अनुसूचित जातींवरील अत्याचारांची प्रकरणे दरवर्षी हजारोंच्या संख्येने नोंदवली जात आहेत. म्हणजेच, सामाजिक न्यायाचा मूलभूत प्रश्न अजूनही सुरक्षा आणि सन्मानाचा आहे. अशावेळी सरकारचे प्राधान्य काय असावे? अत्याचार रोखणे की आरक्षणाचे गणित मांडणे?

बदर समितीचे समर्थक म्हणतात की, उपवर्गीकरणाशिवाय न्याय्य वाटप शक्य नाही. पण हा युक्तिवाद अर्धवट आहे. कारण जर प्रत्येक गटाला स्वतंत्र वाटा हवा असेल, तर आरक्षणाची संकल्पना तुकड्या-तुकड्यांत विभागली जाणार नाही का? आणि मग शेवटी सामाजिक एकात्मतेचे काय? यामध्ये एक धोकादायक प्रवृत्ती दिसते, सामाजिक न्यायाच्या प्रश्नाचे राजकीय गणितात रूपांतर. समाजातील असंतोष ओळखून त्यावर उपाय करण्याऐवजी, त्याचा वापर सत्तेसाठी करणे हा अधिक सोपा मार्ग असतो. बदर समिती हा त्याच दिशेने टाकलेला पाऊल आहे का, हा प्रश्न विचारायलाच हवा. हेही लक्षात घ्यायला हवे की सर्वोच्च न्यायालयाने या विषयावर स्पष्ट आणि अंतिम भूमिका घेतलेली नाही. म्हणजेच, हा विषय अजूनही कायदेशीरदृष्ट्या अनिश्चित आहे. अशा परिस्थितीत घाईघाईने धोरणात्मक निर्णय घेणे म्हणजे पुढे जाऊन मोठ्या संविधानिक संघर्षाला आमंत्रण देणे होय. सरकारने स्पष्ट भूमिका घ्यावी, बदर समिती हा केवळ अभ्यासासाठी आहे का, की तिच्या शिफारशी अंमलात आणण्याचा विचार आहे? जर दुसरा पर्याय खरा असेल, तर तो संविधानिक संघर्षाचा मार्ग आहे हे स्पष्ट आहे. शेवटी, सामाजिक न्याय हा प्रयोगांचा विषय नाही. तो संवेदनशीलता, समतोल आणि संविधानिक निष्ठा यांचा प्रश्न आहे. आयोग आणि समित्या उभ्या करणे सोपे आहे, पण न्याय देणे कठीण आहे. महाराष्ट्राला आज घोषणांची नाही, तर स्पष्टतेची गरज आहे. अन्यथा सामाजिक न्यायाच्या नावाखाली सुरू झालेला हा प्रवास विश्वासघातात बदलण्यास वेळ लागणार नाही. ■ ■

## वाचकांचे विचारपीठ

बहुजन सौरभ

### जादूगाराची जादू फसली...

जा लेख सत्यशोधकी परंपरेला साजेसा असा आहे. त्यामधून लोकशाही व संविधानाला अभिप्रेत समतावादी भूमिकेचा जोरकसपणे प्रतिवाद केला आहे. त्याचबरोबर विरोधी पक्षनेते मा.राहुल गांधी यांनी जादूगाराचे जे उदाहरण देवून सत्ताधारी पक्षाला घायाळ केले. तो मुद्दा केंद्रस्थानी घेवून आपण खऱ्या अर्थाने सत्यशोधकी पत्रकारीतेचा आदर्श निर्माण केला आहे आणि भविष्यातील धोके लक्षात घेतली नाही तर INDIA आघाडीचे हे यश तात्कालिक ठरू शकते. ही भीती व्यक्त करून भविष्याचा वेध घेतला आहे. आपले अभिनंदन व अशीच लेखनीची तलवार तळपत राहो हीच सदिच्छा.

- प्रदीप शेंडे ■ ■

### 'अलर्ट' ही कविता आशयगर्भ

प्राचार्य डॉ. महेंद्रकुमार मेश्राम सर यांची 'अलर्ट' ही कविता आशयगर्भ आणि तीव्र सामाजिक भान व्यक्त करणारी आहे. इतकेच नव्हे तर अलीकडील सामाजिक आणि राजकीय वास्तवावर भाष्य करणारी अशी चिंतनगर्भ कविता आहे. कवीने या कवितेत येलो अलर्ट आणि रेड अलर्ट या शब्दांचा वापर केवळ नैसर्गिक आपत्तीपुरता मर्यादित स्वरूपात केला नसून तो व्यापक सामाजिक आणि नैतिक संकटासाठी या शब्दांचा वापर केलेला आहे. या कवितेतून कवीची कमी शब्दात मोठा आशय व्यक्त करण्याची जी ताकत आहे ती नेमकेपणा व्यक्त करणारी आहे. या कवितेतून कवीने भूतकाळातील इशाऱ्यांचा संदर्भ देऊन वर्तमानातील परिस्थितीवर भाष्य केले आहे. बाह्य संकटापेक्षा अंतर्गत मूल्यसंकट अधिक धोकादायक असते ही जाणीव त्यांनी येलो अलर्ट म्हणजे एक प्रकारचा बाह्य संकटावरील सावधानतेचा इशारा तर रेड अलर्ट हा शब्द वापरून त्यांनी लोकशाही आणि संविधानाच्या संदर्भात गंभीर धोका आहे असे सूचित केले आहे. या देशातील लोकशाहीचे खरे संकट बाह्य नसून तिच्या अंतर्गत मूल्य ऱ्हासात आहे असे कवीला येथे म्हणावयाचे आहे. आपण बाह्य संकटासाठी जसे तत्पर असतो तसेच आपण नैतिक आणि सामाजिक संकटासाठी सुद्धा तत्पर असणे आवश्यक आहे. लोकशाहीचे तत्वज्ञान आपण आपल्या सोयीप्रमाणे वापरतो अशी तीव्र खंत कवीने येथे व्यक्त केली आहे.....वर्तमान स्थितीतील सामाजिक जाणिवेतून आशयगर्भ कविता लिहिल्याबद्दल डॉ. महेंद्रकुमार मेश्राम यांचे खूप खूप अभिनंदन आणि धन्यवाद !

- डॉ. पुनम येसंबरे, वर्धा ■ ■

# झोंबी ड्रग (झायलाझीन)

## मेंदूचा विध्वंस आणि मानसिक आरोग्याचा भयावह अंत

**झोंबी ड्रग (झायलाझीन) आणि मानसिक आरोग्य :** मेंदूचा विध्वंस आणि आयुष्याचा अंत कसा होत जातो, तसेच परमानंदापासून मनोविकृतीपर्यंत झोम्बी ड्रगचा लपलेला मानसिक परिणाम टप्याटप्याने मानसिक आरोग्य कसे पोखरतो हे आपणआजच्या लेखात पाहणार आहोत. मीरा-भाईंदरसह भारतातील विविध शहरांत रस्त्यावर तासन्तास मान झुकवून, शरीर वाकलेल्या अवस्थेत स्तब्ध उभे राहणारे तरुण दिसतात. हे 'झोंबी' दृश्य केवळ शारीरिक नाही, तर मानसिक आरोग्याचा गंभीर धोका दर्शवते. 'झोंबी ड्रग' म्हणून ओळखले जाणारे झायलाझीन (Xylazine) हे पशुवैद्यकीय वेदनाशामक औषध आता नशेसाठी गैरवापरले जाते. हे घोड्यांसाठी बनवलेले असले तरी मानवी मेंदू आणि मनावर त्याचे परिणाम भयावह आहेत. झायलाझीन मेंदूवर कसा परिणाम करते? झायलाझीन हे अल्फा-2 ॲड्रेनर्जिक ॲगोनिस्ट आहे. ते मेंदूतील नॉरएपिनेफ्रिन (norepinephrine) च्या मुक्त होण्यास अडथळा आणते. परिणामी केंद्रीय मजासंस्था (CNS) गंभीरपणे दबली जाते. व्यक्ती गाढ झोपेत किंवा 'नोडिंग आउट' अवस्थेत जाते. तासन्तास बाह्य जगाशी संपर्क तोडून. डिसोसिएटिव्ह इफेक्ट्स -वास्तवाची जाणीव कमी होते, स्वतःची ओळख आणि सभोवतालचे भान हरवते. यामुळे 'झोंबी'सारखी अवस्था निर्माण होते. हे औषध इतर ड्रग्स (फेंटॅनिल, हेरॉईन इ.) सोबत मिसळले जाते. यामुळे नशा दीर्घकाळ टिकते, पण मेंदूवर अतिरिक्त ताण पडतो.

**तात्कालिक मानसिक परिणाम :-**

गोंधळ आणि स्मृतीभ्रंश : वापरकर्ते गोंधळलेले, दिशाहीन वाटतात. घटना आठवत नाहीत.

भ्रम आणि मतिभ्रम (Hallucinations): काहींना आवाज ऐकू येतात किंवा नसलेल्या गोष्टी दिसतात.

चिंता आणि अस्वस्थता : नशेनंतर तीव्र चिंता, बेचैनी.

मूड स्विंग्स : क्षणिक आनंदानंतर खोल नैराश्य. हे परिणाम केवळ नशेच्या वेळीच नसतात; ते दीर्घकाळ टिकू शकतात.

**दीर्घकालीन मानसिक आरोग्य समस्या :-** झायलाझीनचा सतत वापर मेंदूच्या रसायनिक संतुलनाला (neurotransmitters -डोपामाइन, नॉरएपिनेफ्रिन) हानी पोहोचवतो. यामुळे नैराश्य (Depression), आनंद हरवणे, निराशा, आत्महत्या विचार वाढणे. चिंता विकार (Anxiety Disorders) : सतत भीती, पॅनिक अटॅक्स. सायकॉसिस (Psychosis) : वास्तव आणि कल्पना यात फरक न राहणे. हॅलुसिनेशन्स आणि डिल्युजन. संज्ञानात्मक कमजोरी : एकाग्रता, स्मरणशक्ती, निर्णयक्षमता कमी होणे. व्यसन आणि सोडण्याची अडचण : व्यसन लागणे सोपे, पण सोडणे कठीण. सोडण्याच्या वेळी तीव्र चिंता, चिडचिड, अस्वस्थता, झोप न लागणे, मूड स्विंग्स येतात. कधीकधी उच्च रक्तदाब किंवा हृदयविकाराचा धोका. याशिवाय, त्वचेच्या जखमा (गँगरीनसारख्या) आणि अंग कापण्याची भीती यामुळे लाज, अपमानाची भावना, एकाकीपणा वाढतो. व्यक्ती समाजातून दूर जाते, कुटुंबापासून अलग होते. हे नैराश्य आणि चिंता अधिक गंभीर करते. का वाढतो हा धोका? अनेक तरुण तणाव, निराशा, उत्तेजना विसरण्यासाठी नशा करतात. पण झायलाझीनसारखे औषध मूळ समस्या सोडवत नाही, उलट नव्या मानसिक आजार निर्माण करते. भारतात मानसिक आरोग्य समस्या (नैराश्य, चिंता) आधीच वाढत आहेत. ड्रग्स यात भर घालतात. 'एकदा ट्राय करून बघू' ही भावना घातक ठरते, कारण व्यसन लवकर लागते आणि मेंदूचे नुकसान अपरिवर्तनीय होऊ शकते.



प्रवीण गांगुर्डे
मनसोपचारतज्ञ

**उपचार आणि मदत :-** मानसिक आरोग्याच्या दृष्टीकोनातून उपचार फक्त शारीरिक नाहीत व्यसनमुक्ती केंद्र वैद्यकीय देखरेखीत डिटॉक्स. झायलाझीन आणि ओपिओइड दोन्हींचे लक्षण व्यवस्थापन करावे लागते. मानसोपचार : नैराश्य, चिंता किंवा सायकॉसिससाठी आवश्यक औषधे घ्यावी लागतात. सपोर्ट सिस्टम : पालक, मित्र, समाजाने नशा करणाऱ्याला दोष न देता मदत करावी. लाज न बाळगता डॉक्टरांकडे जावे. **मेंदू आणि मन वाचवा :-**




झायलाझीन केवळ शरीर सडवत नाही, तर मेंदूचा विध्वंस करते. एका क्षणिक 'मौज'साठी संपूर्ण मानसिक आरोग्य, निर्णयक्षमता, नातेसंबंध आणि आयुष्य गमावणे हे कधीही योग्य नाही. तणाव, नैराश्य असेल तर नशेचा मार्ग नको. व्यायाम, आनापान, विपश्यना ध्यान, बोलणे, व्यावसायिक मदत घ्या. पालक आणि समाजासाठी आवाहनः युवकांच्या मानसिक आरोग्याकडे लक्ष द्या. लक्षणे दिसताच मदत करा. 'झोंबी' दृश्य नेहमीचे होऊ देऊ नका. आयुष्य जगण्यासाठी नशा नाही, जागरूकता आणून आणि स्वतःला मदत करून आयुष्य जगायचे आहे. मानसिक आरोग्य हा अधिकार आहे. त्याची काळजी घ्या. मदत घ्या. निरोगी राहा. जर तुम्हाला किंवा तुमच्या ओळखीच्या व्यक्तीला अशी समस्या असेल, तर ताबडतोब जवळच्या मानसिक आरोग्य व्यावसायिक, मानसोपचार तज्ञ, मानसोपचार सामाजिक अधिक्षक, किंवा व्यसनमुक्ती पुनर्वसन केंद्राशी संपर्क साधा. वेळीच सावध राहणे हेच खरे उपचार आहेत. ■ ■

# सात प्रकारच्या भार्या, पत्नी, बायको

एकदा भगवान बुद्धांनी दानशिलते बद्दल बोलताना आनाथपिंडकाला भिक्षु संघासाठी केलेल्या दानाचे महत्त्व सांगत होते. ते म्हणाले 'अनाथपिंडक' भिक्खू संघाला रोज अन्नदान करीत असतो. ते अत्यंत श्रेष्ठ दान आहे. अन्नदानापेक्षाही श्रेष्ठ जे दान दिले ते भिक्खू संघासाठी विहार बांधून दिले, आणि विहार बांधण्यापेक्षाही बुद्धाला, धम्माला, व संघाला, शरण जाणे पंचशीलाचे पालन करणे, अष्टशिलाचे पालन करणे, दहा पारमिताचे पालन करणे, चार आर्य सत्य जाणून घेणे, मैत्री भावना, ध्यान करणे, हे श्रेष्ठ आहे. आणि त्याहीपेक्षाही श्रेष्ठ आहे, अंतरदृष्टी वस्तूची क्षणभंगुरता, जीवनाची क्षणभंगुरता जाणून घेणे हे त्यापेक्षाही श्रेष्ठ आहे,' असे बुद्ध म्हणतात. अनाथपिंडक रोज विहारात जात असे, परंतु तो खाली हात कधीच केला नाही, कधी भिक्खू संघाकरिता अनेक प्रकारचे फळे काही ना काही ते विहारात घेऊन जात असे, अगरबत्ती. मेणबत्ती. पूजेचे फुले. हे रोजच नेत असे, अनाथपिंडक बुद्धांना रोज भेटत असे. आणि ज्यावेळी भगवान बुद्ध धम्म प्रचारासाठी कधी बाहेर जात असत. त्यावेळी बुद्धाच्या गैरहजेरीत त्यांची निराशा होत असे. अनाथपिंडकास जेव्हा हे जाणवले. तेव्हा त्याने भन्ते आनंदास विचारणा केली की, बुद्धांच्या गैरहजेरीत त्यांच्या स्मरणार्थ आम्ही कोणाला वंदावे ? ही गोष्ट आनंदाने बुद्धाच्या कानी घातली, त्यावर बुद्धांनी एक उपाय सुचविला, जेतवन विहाराच्या प्रवेश द्वारावर एक 'बोधीवृक्ष' लावण्यात सांगितले, विहाराच्या प्रवेशद्वारावर बोधिवृक्ष लावण्यात आला. त्याला 'आनंदबोधिरुक्ष' संबोधण्यात आले आणि त्यांची पूजा माझ्या गैरहजरित करीत जा, असे बुद्धांनी सांगितले. एकदा भगवान बुद्ध अनाथपिंडकाच्या वाड्यात भेटीसाठी गेले असता, वाड्यातून आतून अचानक त्यांनी कोणाच्या तरी ओरडण्याचा आवाज ऐकला, जेव्हा भगवंतांनी विचारले की, 'तो आवाज कशाचा आहे? तेव्हा अनाथपिंडकाने उत्तर दिले,' भगवान तो आवाज सुजाताचा आहे, माझ्या सुनेचा आवाज आहे. ती आमच्याबरोबर राहत असते, ती एका अत्यंत गर्भश्रीमंतात असलेल्या श्रेष्ठीची मुलगी आहे. ती तिच्या सासूची, सासऱ्याची किंवा नवऱ्याची सुद्धा परवा करीत नाही, एवढेच नव्हे तर आपल्या आदरणीय भिक्षुची किंवा भिक्खूसंघाचा वा बुद्धाचाही आदर करीत




नाही. 'तेंव्हा बुद्धांनी सुजाताला जवळ बोलाविले आणि उपदेश दिला की सात प्रकारच्या पत्नीचे कर्तव्य व स्वभाव वर्णन करणारे प्रभावशाली उपदेश केला, ते प्रवचन, उपदेश जसे अडीच वर्षापेक्षाही पूर्वीच्या गृहिणींना लागू होत होते, तसेच आजच्या आधुनिक गृहिणीला सुद्धा लागू होत आहेत, लागू पडते. पत्नीचे सात प्रकारचे स्वभाव. व गुण. सात प्रकारच्या स्वभावाच्या विचारांच्या बायका असतात त्या येणे प्रमाणे. 1) जी पत्नी मनाने दुष्ट असते, वाईट विचारांनी दुग्ध असते, दया विहीन असते, जी स्वतःच्या पतीकडे दुर्लक्ष करून दुसऱ्या पुरुषाकडे आकर्षित होते, जी वेश्यावृत्ति धारण करते. ती दुसऱ्यांना मनस्ताप देते अशा पत्नीला 'वधकाभारीया' पत्नी अर्थात उपद्रवी पत्नी असे म्हणतात. 2)पतीने अल्प का होईना परंतु स्वतःच्या कष्टाने, स्वतःच्या मेहनतीने, स्वतःच्या कलेने, धनसंपदा कमावली, किंवा व्यापाराने अथवा शेतीतून मिळवलेल्या मिळकतीची उद्धळपट्टी जी करते, वा करू इच्छिते, त्या पत्नीला 'चोर भारीया' अथवा चोर पत्नी म्हणतात. 3) जी काहीच करू इच्छित नाही, जी आळशी आहे. जी खादाड आहे. जी वाचेने कठोर आहे. जी कुर आहे, जी बोलण्यात असभ्य आहे, उद्योगी व्यक्तीवरही व्यर्थ हुकूम चालवण्याचा प्रयत्न करते. अशा पत्नीला घमेंडखोर किंवा अभिमानी पत्नी अर्थात 'अय्याभारीया' पत्नी असे म्हणतात. 4) जी पत्नी, दयाळू व प्रेमळ आहे जी आपल्या पतीची आईप्रमाणे संरक्षण करते, मुलाप्रमाणे त्यांचा सांभाळ करते पतीने मिळवलेल्या संपत्तीचे संरक्षण करते. अशा पत्नीला आई सदृश्य पत्नी अथवा 'मातृभारीया' पत्नी असे म्हणतात. 5) ज्याप्रमाणे लहान बहीण तिच्या मोठ्या भावाचा आदर करते. सन्मान करते. भावाशी विनयाने वागते त्याच्या प्रत्येक शब्दाला मान सन्मान देते, त्याचप्रमाणे एखादी पत्नी तिच्या नवऱ्याशी प्रेमाने वागते, त्या पत्नीला 'भगिनीभार्या' असे म्हणतात. 6) ज्याप्रमाणे एखांदा मित्राला त्याचा मित्र बऱ्याच कालावधीनंतर भेटला तर अत्यंत आनंद होतो, त्याचप्रमाणे पतीला बाहेरून आल्याबरोबर ज्या पत्नीला अतिशय आनंद होतो, त्या पत्नीचा जन्म श्रेष्ठ सदगुणाने युक्त व पवित्र असून तिला 'सखीभारिया' अर्थात मित्रासमान पत्नी असे म्हणतात. 7) ज्या पत्नीला पतीने दुःखातून शिक्षा केली असली तरी जी शांत राहून सगळे सहन करते व ते सहन करताना जी पतीबद्दल थोडाही द्वेष करीत नाही, रागे भरत नाही, आई बापाच्या घरी (माहेरी) जातो म्हणतनाहीआणि दृष्टता बाळगत नाही. पतीशी अबोला धरत नाही. पतीचा द्वेष करीत नाही, व पतीच्या इच्छाप्रमाणे वागते, अशा पत्नीला 'दासीभारीया' अर्थात दासपत्नी असे म्हणतात. बुद्धांनी त्या सात प्रकारच्या पत्नीचे वर्णन केले. त्यातील 'वधकाभारीया' म्हणजे उपद्रवी पत्नी. चोर भारीया (चोर पत्नी) 'अय्याभारी' ( घमेंडखोर पत्नी) या स्वभावाच्या पत्नीला अत्यंत वाईट व आपत्ती जनक पत्नी असे म्हटलेले आहे, तर 'मातृभारीया' ( आईसमान पत्नी )व 'दासीभारीया' ( दासी पत्नी)या उत्तम प्रकारच्या पत्नी असून त्या प्रशंसनीय आहेत असे बुद्धाने म्हटले आहे. तथागत पुढे म्हणाले, मग सांग सुजाता, वरील सात प्रकारच्या पत्नी असून त्यामध्ये तुला कोणत्या प्रकारात राहणे आवडेल.? तेव्हा यावर सुजाता म्हणाली 'भगवान मला यापुढे दासी भारिया (दास पत्नी) म्हणूनच राहणे आवडेल. म्हणून बुद्धांनी यापुढे सुजाताला दासीभारी म्हणूनच ओळखावे असे म्हटले आहे. ■ ■

**अमृतवाणी ही बुद्धाची**



देविदास राऊत
(बौद्धाचार्य)
मो. 8668238330

“ अडचणी म्हणजे संधींची दारे, योग्य नजरेतून त्यांना पाहा... ”

बहुजन सौरभ
BAHUJAN SAURABHA



# बुद्धांनी चमत्कार अघोरी विद्या नाकारली ?

**पुरोगामी महाराष्ट्रात अंधश्रद्धेतून होणारे शोषण रोखण्यासाठी आणि नरबळी, अघोरी प्रथा पूर्णपणे नष्ट करण्यासाठी महाराष्ट्र नरबळी व इतर अमानुष, अघोरी व दुष्कर्मी प्रथा आणि काळी जादू अधिनियम 2013 'हा जादूटोणा विरोधी कायदा पारित करण्यात आला आणि केवळ 13 वर्षातच अशोक खरात या भोंदू बाबाने हिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर पासून राज्याचे मंत्री, संत्री, अधिकारी पासून केंद्राच्या मंत्र्यांपर्यंत सर्वांना या अघोरी विद्यांत सामील करून ज्योतिष, काळी जादू आणि नरबळीने जादू टोना विरोधी कायद्याचे हरताळ फसला आहे.**




दैवी शक्तीचा दावा करून जादूटोणा व भोंदूगिरी करणाऱ्या खरात याने महिलांचे आर्थिक सामाजिक आणि लैंगिक शोषण केले आहे. त्यामुळे सध्या ज्योतिष चमत्कार आणि अघोरी विद्या बद्दल बरेच काही बोलले जात आले. विज्ञान युगात मानव चंद्रावरून मंगळावर निघाला असताना आजही अडाणीच नव्हे तर उच्चशिक्षित लोक अज्ञान, अंधश्रद्धा, बुवा बाबा, अघोरी विद्याच्या नादी लागत आहेत. परंतु 2800 वर्षा पूर्वी विज्ञानाचा शोध लागला नव्हता. तेव्हा तथागत गौतम बुद्धांनी ज्योतिष चमत्कार आणि अघोरी विद्या नाकारली होती. एका शहरात एक तांत्रिक बाबा एक तबकडी हवेत उच्च फेकून आकाशात फिरती ठेवल्याने लोकांना तो मोठा जादुगार वाटू लागला. तो चमत्काराने लोकांना फसवत असल्याचे लक्षात आलेल्या तेथून जाणाऱ्या एका बौद्ध भिक्षुकाच्या लक्षात येताच. त्याने आपल्या हातातील भिक्षापात्र हवेत भिरकावून हवेत फिरत ठेवले आणि तांत्रिक बाबाची परीक्षा घेण्यास अवकाशात झेप घेत भिक्षापात्र घेऊन आला. त्यामुळे लोक तांत्रिक बाबापेक्षा बौद्ध भिक्षुकाकडे आकर्षित होऊ लागले. सोबतच्या भिक्षुकांनी घडलेला प्रकार तथागत बुद्धांना सांगितला. तेव्हा बुद्धांनी त्या भिक्षुकाला परत असा चमत्कार करण्यास विरोध केला. बुद्धाचे चुलत भाऊ देवदत्त यांनी देखील रिद्धी सिद्दी सारख्या अघोरी विद्या अवगत करून बुद्धांना जिवंत मारण्याचा बरेच वेळा प्रयत्न केला. परंतु त्यात तो सफल झाला नाही. अखेर त्याने काही भिक्षुकांना सोबत घेऊन बुद्धाचा संघ सोडला. झाल्या प्रकार नंतर काही भिक्षुकांनी आपण रिद्धी सिद्दी, अघोरी विद्या आणि ज्योतिष शास्त्र का मनात नाही? असा प्रश्न बुद्धाला विचारला. त्याचे उत्तर देताना बुद्ध म्हणतात की, बुद्ध धम्माचा (अहिंसा, मध्यम मार्ग) तर अघोरी विद्या (तांत्रिक, स्मशान साधना) हे दोन भिन्न आध्यात्मिक मार्ग आहेत. अघोरी शिवोपासक असून स्मशानात अद्वैत साधना करतात, तर बुद्ध तृष्णा, क्षय आणि करुणेवर आधारित बौद्ध धर्माचे प्रवर्तक आहेत. अघोरी प्रक्रियेत घृणा-भीती नष्ट करणे महत्त्वाचे आहे, तर बुद्ध कर्माच्या शुद्धतेवर भर देतात. अघोरी विद्या अघोरी मार्ग हा शैव संप्रदायातील 'अघोर' पंथाचा एक भाग आहे, जो तंत्रविद्येचा अवलंब करतो. या उलट आपण मध्यम मार्गाचा (Middle Path) पुरस्कार करतो. आपण अत्यंत कठोर तपश्चर्या आणि अतिभोग या दोन्ही टोकांपासून दूर आहे. कारण अघोरी साधक स्मशानात राहून, चितेवर शिजवलेले अन्न खाऊन, कवट्यांचा वापर करून ध्यान करतात. ते भीती आणि किळस या भावनांवर विजय मिळवण्याचा प्रयत्न करतात. धम्ममध्ये मनाची शुद्धता, शील आणि विपश्यना ध्यान पद्धतीवर भर दिला आहे, ज्यात हिंसा किंवा अशुद्धतेला स्थान नाही. अघोरींचे 'अद्वैत' तत्त्व असून त्यांच्या मते जगात सर्वकाही शुद्ध आहे. त्यामुळे ते पवित्र-अपवित्र भेद मानत नाहीत. बुद्धांनी 'समता' आणि 'मैत्री' शिकवली, पण ती नैतिक नियमांच्या (पंचशील) चौकटीत राहून. बुद्धांनी त्रिशरन पंचशील, अष्ट शील आणि दस शील ही भिक्खूंसाठी कडक विनय नियमावली आणि मध्यम आचरणाची शिकवण दिली. थोडक्यात काय तर अघोरी विद्या ही तीव्र तांत्रिक साधना (अति-साधना) आहे, तर बुद्धांचा मार्ग हा आंतरिक शांतता आणि नैतिकतेवर आधारित (मध्यम-मार्ग) आहे. या दोन्ही मार्गांचे उद्देश्य मोक्ष किंवा निर्वाण प्राप्त करणे असला तरी त्यांचे मार्ग पूर्णपणे भिन्न आहेत. बुद्धांनी रिद्धी-सिद्धी का नाकारली याची प्रमुख कारणे खालीलप्रमाणे आहेत. मूलभूत उद्देश दुःखाचा नाश, बुद्धांचे शिक्षण दुःखातून मुक्ती मिळवण्यावर केंद्रित होते. रिद्धी-सिद्धीमुळे मानवी दुःखाचे मूळ कारण नष्ट होत नाही. अहंकाराचे कारण, चमत्कारी शक्तींमुळे अहंकाराला खतपाणी मिळते, जे बौद्ध धर्माच्या 'अनात्म' (selfless) तत्त्वाच्या विरोधात आहे. खऱ्या ज्ञानापासून विचलित बुद्धांनी सांगितले की, रिद्धी-सिद्धी हे मनाला ध्यानापासून आणि आत्मज्ञानापासून दूर घेऊन जातात, ज्यामुळे 'निर्वाण' प्राप्ती कठीण होते. रेखी हा रिद्धी-सिद्धी मधील एक प्रकार आहे. माणसाच्या दुखत असलेल्या भागावरून हात फिरविला की दुखणे कमी होते. बौद्ध धम्मात देखील अनेक लोक रेखाचे शिक्षण घेऊन रेखी करीत असतात. रेखाचे ऑनलाईन क्लासेस चालविले जातात. बुद्ध म्हणतात रेखी हे तात्पुरते मानसिक समाधान आहे. बुद्ध म्हणतात की दुःखाचे मूळ शोधा म्हणजे दुःख निवारण्याचा मार्ग सापडेल. दुःखातून बाहेर पडण्यासाठी चार आर्य सत्य समजून घेण्याची गरज आहे. त्यासाठी पंचशील आर्य अष्टांगिक मार्गावर चाला. कुशल मार्गावर चालण्याचे कुशल आणि अकुशल मार्गावर चालण्याचे अकुशलच होणार हा निसर्गाचा नियम आहे. बुद्ध म्हणतात आणि संघात ज्योतिष, चमत्कार आणि अघोरी विद्या पाहून लोकांचा गैरसमज होऊन लोक बुद्धांना देव किंवा जादूगार मानू लागतील, ज्यामुळे बुद्धांच्या शिकवणीचे मूळ तत्त्व लोप पावेल, रिद्धी सिद्दीने ईश्वर आणि त्याचे अस्तिव मानले जाते. बुद्धाचा मार्ग शाश्वत शांती (निर्वाण) देणारा आहे. बुद्धांनी भिक्खूंना केवळ नीतिमत्ता, प्रज्ञा आणि करुणेच्या मार्गावर चालण्याची शिकवण दिली, चमत्कार दाखवण्याची नाही.



आनंद म्हस्के
मो. 8652325032

अघोरी विद्याने मेलेला माणूस जिवंत करता येतो. असा दावा केला जातो. तर पृथ्वीवर काही माणसे अजरामर जगत राहिली असती. बुद्ध म्हणतात, जन्म आणि मरण हे कालचक्र कोणालाच सुटलेले नाही. जन्माला आलेला प्राणी हा मरणारच! त्यासाठी किस्सा गौतमीची गोष्ट पुरेशी आहे. एकुलत्या एक बाळाच्या निधनाने दुःखी, व्याकूळ झालेली गौतमी माझ्या बाळाला जिवंत करण्यासाठी सर्वांकडे गेली. पण कोणीच तिचे बाळ जिवंत करू शकले नाही. तिला कोणी म्हटले, तुझे बाळ फक्त बुद्धच जिवंत करू शकतात. ती मोठ्या आशेने बुद्धाजवळ येऊन माझे बाळ जिवंत करण्याची याचना करू लागली. तेव्हा बुद्ध म्हणाले, मी तुझे बाळ जिवंत करेन, पण अशा घरातून काळ्या मोहऱ्या घेऊन ये, ज्या घरात कोणी मरण पावलेले नाही. गौतमी मोठ्या आशेने प्रत्येक घरात जाऊन तुमच्या घरी कोणी मेले नसेल तर माझ्या बाळाला जिवंत करण्यासाठी मूठभर काळ्या मोहऱ्या देण्याची विनवणी करते. पण माणूस मेले नाही असे एकही घर सापडत नसल्याने गौतमीच्या लक्षात येते की जन्म मरण हे कालचक्र आहे. त्यातून कोणी सुटलेले नाही. दुःखातून मुक्तोन्यासाठी गौतमी बुद्धाचा संघात येते.
शरीरात भावनिक, मानसिक आणि आध्यात्मिक शक्ती विकसित करण्यासाठी बौद्ध धम्मात ध्यानधारणा आहे आणि स्वयम् प्रकाशित होण्यासाठी बुद्धाचा धम्म आहे. स्वामी विवेकानंद म्हणतात की, जगातील अंतिम सत्य बुद्ध आहेत. त्यांनी देवा या संकल्पनेशी थोडी जरी तडजोड केली असती, तर त्यांच्या अगोदर आणि नंतर एकही धर्म अस्तित्वात राहिला नसता. सर्वांनी त्यांचा धर्म स्वीकारला असता. पण देव नाही हे अंतिम सत्य आहे. देव धर्म आणि अंधविश्वास यामधून लोकांना बाहेर पडण्यासाठी त्यांनी बौद्ध धम्म दिला आहे. ज्या ज्या माणसांनी आणि देशांनी धम्म आचरण केले त्यांचा विकास आणि विकासच झाला आहे. ■ ■

## वैशिष्ट्य

### अनंतायन



अॅड. अनंत खेळकर
मो. 9370061677

शत्रु, विरोधक, वैरी या वेगवेगळ्या नावांनी प्रचलित असलेल्या व्यक्ती देखील मोठ्या भाग्याने मिळतात, असे थोर शत्रु कमावण्यासाठी सर्वप्रथम एकतर लोकांचे भले करावे लागते, नाहीतर यशस्वी व्हावे लागते. किंवा तुमच्यात कोणत्यातरी गोष्टीचे कौशल्य असावे लागते.
अशा महान विचारांची ही मंडळी गिधाडांच्या वंशावळीतील असते. ते कोकीळेचा गोड आवाज दाबून टाकू शकतात पण स्वतःच्या आवाजात तो गोडवा निर्माण करू शकत नाही. ज्याप्रमाणे सज्जन व्यक्तींचे विरोधक त्यांना भलेही बदनाम करतील पण ते स्वतः मात्र सज्जन होऊ शकत नाहीत. ही माणसेही त्या प्रवृत्तीची असतात. अशा विरोधकांची एक वैशिष्ट्यपूर्ण गोष्ट म्हणजे त्यांना हा विश्वास असतो की, या जगात बुद्धि ही फक्त आपल्याजवळ आहे. यांच्या लेखी पतंग आणि समोरची व्यक्ती ही सारखीच असते, जोवर उंचीवर तोवर वाहवा, खाली येताच कचरा कुंडी. यांच्या बाबतीत एक मतप्रवाह असा आहे की, 'ये लोग मतलब की बात तो आसानी से समझ लेते है, लेकिन बात का मतलब समझने का वक्त आए तो अपना रास्ता बदल लेते है,
जर एखाद्याची आर्थिक परिस्थिती बिघडली तर ही मंडळी त्यांना हा अनुभव देते की, गरीबी म्हणजे तेजाब आहे ज्यात रक्ताचे नाते जळून जातात. पण पैशाचे चुंबक असेल तर ते वैऱ्यांनाही जोडून ठेवते. आयुष्यात वेगवेगळ्या विचारसरणीच्या व्यक्ती येतात. ते विविध प्रकारचे अनुभव देऊन जातात. पण चांगल्या माणसांना हे सर्वकाही सहन करावेच लागते. त्यांची अवस्था अशी असते की,
'किसीको काँटों से चोट पहुँचीं, किसीको फुलोंने मार डाला, जो बच गए इन मुसीबतों से, उन्हें उसुलों ने मार डाला.' ■ ■

बहुजन सौरभ

# गोंदियातील आंबेडकर जयंती उत्सव आणि वैचारिक क्रेझ

**यंदा महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची 135 वी जयंती गोंदिया शहरात अत्यंत उत्साहात आणि वैचारिक उर्जेसह साजरी करण्यात आली. ही जयंती केवळ उत्सवापुरती मर्यादित न राहता समाजमनात परिवर्तन घडवणारी ठरली, असे चित्र यावर्षी दिसून आले.**




शहरभर जणू विचारांचा आणि सामाजिक जागृतीचा महोत्सवच अनुभवायला मिळाला. 10 एप्रिलपासूनच राष्ट्रपिता महात्मा ज्योतिबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीचा सोहळा विविध ठिकाणी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याची सुरुवात भीमनगर येथील मैत्रेय बुद्ध विहारातून झाली. या मैदानाची वैचारिक परंपरा समृद्ध असून येथे अनेक वर्षांपासून विचारवंत, साहित्यिक, कवी आणि पत्रकार यांच्या माध्यमातून प्रबोधनाची परंपरा अखंड सुरू आहे. 14 एप्रिलच्या मध्यरात्री 12.01 वाजता फटाक्यांच्या आतषबाजीने शहर दुमदुमून गेले. जयस्तंभ परिसरात मोठ्या प्रमाणात बौद्ध आणि आंबेडकरवादी नागरिक एकत्र येऊन उत्सव साजरा करताना दिसले. या निमित्ताने वैचारिक प्रबोधनाची मुहूर्तमेढ रोवून डॉ. बाबासाहेबांचे विचार जनमानसात पोहोचवण्यात आले. रामनगर, फुलचूरपेठ, नंगपुरामुर्री, गौतमनगर या भागांतही विविध कार्यक्रमांद्वारे जयंती साजरी करण्यात आली.

**ओबीसी, सिंधी आणि मारवाडी समाजातही विचारांची पेरणी :-** यंदाची विशेष बाब म्हणजे ओबीसी समाजातील लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते तसेच सिंधी आणि मारवाडी वस्त्यांमध्येही जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. विविध ठिकाणी नाश्ता, फळे, ज्यूस, मसाले भात, मठ्ठा तसेच पुस्तकांचे वाटप करून सामाजिक ऐक्याचा संदेश देण्यात आला.

**'जागर समतेचा - महामानवाच्या जयंतीचा' :-** जयंतीपूर्वी शहर व ग्रामीण भागात भव्य बाईक रॅली काढून समतेचा संदेश देण्यात आला. स्वातंत्र्य, समानता, बंधुता आणि एकात्मतेचे विचार लोकांपर्यंत पोहोचवले गेले. दुपारनंतर शहरात गीत, डीजे आणि सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून तरुणाईने उत्सवात रंग भरला. महिलांनीही मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून कार्यक्रमाला विशेष आकर्षण दिले. अशा प्रकारे जयंती उत्सवातून जर वैचारिक प्रबोधनाची जोड कायम ठेवली, तर समाजात माणुसकीचे मूल्य अधिक दृढ होईल, असे चित्र स्पष्ट दिसते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेले कार्य हे संपूर्ण मानवजातीच्या कल्याणासाठी होते. 'भवतु सब्ब मंगल' या तत्त्वावर आधारित त्यांचे जीवन सर्वांच्या उन्नतीसाठी वाहिले गेले. या महान व्यक्तिमत्त्वाला जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन. ■ ■



मुन्नाभाई नंदागवळी,
मो. 9764676499

# इथल्या मनुवादी व्यवस्थेशी लढणारा महायोद्धा : रवींद्र पोखरकर

जाणीव प्रतिष्ठान अमरावतीद्वारा आयोजित साऊ, ज्योतिबांचा महाराष्ट्र कुठे चाललाय? या विषयाला धरून महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध पत्रकार अभिव्यक्ती youtube चॅनलवरून सत्ताधाऱ्यांच्या धर्मांधतेवर अगदी रोखठोकपणे प्रहार करणारे ज्यांना वारकरी संप्रदायाच्या संतांचे बाळकडू आपल्या आई-वडिलांकडूनच मिळाले आणि मग 'सत्य सांगा लोका जरी लागे कटू' या तुकोक्तीनुसार सरकार पुरस्कृत भोंदू आणि सरकारी पॉकीटे घेणारे प्रायोजित सुपारी बाज कीर्तनकार यांच्यावर जबरदस्त प्रहार करत संत श्रेष्ठ जगद्गुरु तुकोबारायांनी आपल्या शब्दाच्या शस्त्रांनी जोरदार प्रहार करत इथल्या मनुवादी व्यवस्थेचे धर्म सिंहासन गदगदा हलवले होते. कर्तव्य शून्य घाबरट आणि कुर मनुवाद्यांनी जगद्गुरु तुकोबाराय आणि त्यांच्या कुटुंबांवर जे अन्याय अत्याचार केले आणि ते सदेह वैकुंठ गमनापर्यंत जाऊन पोहेचले हे सर्वश्रुत आहे. आज चारशे वर्षांपूर्वीचा तोच मनुवादी सांस्कृतिक प्रवाह सत्तेच्या सोपानापर्यंत जाऊन पोहेचलाय. अशा अत्यंत भक्कम मनुवादी व्यवस्थेचा पाया उखडून टाकण्यासाठी रवींद्र पोखरकर सर महाराष्ट्रामध्ये नव्हे तर ज्या ज्या देशांमध्ये मराठी वाचणारे लोक आहेत. त्या सर्व देशात अभिव्यक्तीच्या माध्यमातून शब्देची शस्त्रे यत्ने करू या तुकोक्तीला अनुसरूत जोरदार हल्ला चढवत आहेत. परिणामी त्यांच्यावर एक एफआयआर सुद्धा दाखल करण्यात आला. परंतु महाराष्ट्र हा संतांची भूमी आहे. आपल्या संतांनी आणि महामानवांनी ज्या व्यवस्थेशी संघर्ष केला ती व्यवस्था आजही उलथून टाकण्यासाठी सज्ज असणारे लोक जिवंत आहे. दोन निवृत्त न्यायाधीश स्वतः रवींद्र पोखरकरांना फोन करतात आणि म्हणतात, आम्ही न्यायाधीश म्हणून निवृत्त झालो असलो तरी तुमच्यावर करण्यात आलेला एफआयआर या संदर्भात कोर्टात तुमचे वकील म्हणून आम्ही स्वतः लढू आणि कुठलीही फी घेणार नाही. त्याचबरोबर महाराष्ट्रातील अत्यंत निष्णात अशा 20 वकिलांची टीम रवींद्र पोखरकर सर यांच्यासोबत अत्यंत ताकदीने उभी राहते. यावरून मला एक ऐतिहासिक उदाहरण आठवले, महात्मा गांधींची हत्या या देशातला पहिला आतंकवादी नथुराम गोडसे यांनी केली. संपूर्ण देश पेटला. मोठ्या प्रमाणावर ब्राम्हणांवर हल्ले व्हायला लागले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज धावले. त्यांनी विश्वनाम शांती सप्ताह घेऊन इथला बहुजन समाज शांत करण्यासाठी एक महिना प्रयत्न केले आणि कुठल्याही प्रकारची दंगल होणार नाही म्हणून त्यांनी सर्वसामान्य बहुजन समाजाला शांततेचे आव्हान केले. तत्कालीन मुख्यमंत्री बाळासाहेब खेर ब्राम्हणांची होत असलेली कत्तल पाहून मुख्यमंत्र्यानी एक वक्तव्य केले की 'माझ्या शरीरात रक्ताचा शेवटचा थेंब असेपर्यंत मी या देशातल्या ब्राम्हणाचा संरक्षण करीन' खेरांच्या या वक्तव्याला ज्यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली ते कर्मवीर भाऊराव पाटील पुढे आले आणि त्यांनी खेरांच्या या वक्तव्याचा जोरदार समाचार घेतला. भाऊराव पाटील म्हणाले की 'खेर साहेब तुमच्या शरीरात रक्ताचे थेंब किती आणि हा बहुजन समाज किती? ब्राम्हणांचे संरक्षण करायचे असेल तर तो फक्त बहुजन समाजच करू शकतो आणि हे खरे ठरले. अगदी मुसलमानांनी सुद्धा ब्राम्हणांना आपल्या घरी लपवून त्यांचा जीव वाचवला. संपूर्ण महाराष्ट्र पेटला होता. कारण राष्ट्रपित्याची हत्या भारतातली जनता हा आघात पचवू शकली नाही. माझ्या मामाचे गाव आहे छोटसे मसदी 25 घर आहे. महात्मा गांधींची हत्या झाली त्यादिवशी गावात अन्न शिजवले नाही आणि आपल्या घरातला एक व्यक्ती मारल्या गेला म्हणून कुटुंबामध्ये ज्या पद्धतीने आपण संस्कार करतो त्या पद्धतीने लोकांनी संस्कार केले, तेरवी केली. सर्व गावकऱ्यांनी खौर अर्थात टकले केले. सर्वसामान्य जनतेच्या हृदयावर अधिराज्य गाजवणारा असा होता आपला राष्ट्रपिता. कर्मवीर भाऊराव पाटलांनी केलेले वक्तव्य हे सत्य जरी असले तरी मुख्यमंत्री बाळासाहेब खेर यांना ते पचले नाही, रुचले नाही आणि त्यांनी रयत शिक्षण संस्थेची ग्रँड बंद केली. ज्या क्षणी गाडगेबाबांना हे कळले त्याक्षणी गाडगेबाबा भाऊरावांच्या मदतीसाठी धावले. या संदर्भात घेण्यात आलेल्या एका मोठ्या परिषदेमध्ये लाखो लोकांच्या साक्षीने स्टेजवर गाडगेबाबांनी कर्मवीर भाऊराव पाटलांच्या पाठीवर हात फिरवला आणि सांगितले भाऊराव घाबरू नको. जोपर्यंत हा गाडगेबाबा जिवंत आहे तोपर्यंत बहुजन समाजाच्या मुलांचे शिक्षण बंद होणार नाही आणि एक लाख रुपयाची थैली हातात दिली. महाराष्ट्रातल्या सांस्कृतिक संघर्षाचे हे वास्तव आपल्या तरुणांना समजले पाहिजे. आपले शत्रू कोण आहेत, आपले मित्र कोण आहेत, आपल्या महामानवांनी कुठल्या व्यवस्थेसोबत जीवघेणा संघर्ष केला. पुढे मुख्यमंत्री खेरांची एक बैठक मुंबईला होती. गाडगेबाबा धर्मशाळेत होते. बाबांना कळले. बाबा बैठकी स्थळी हजर झाले आणि निरोप पाठवला, 'मुख्यमंत्र्याना सांगा गाडगेबाबा तुम्हाला भेटायला आले.' मुख्यमंत्र्याना निरोप गेला. मुख्यमंत्र्यानी सांगितले, बाबांना घेऊन या. गाडगेबाबा म्हणाले, मुख्यमंत्र्यानी इथेच यावे मी आत येणार नाही. मुख्यमंत्री खेर घाबरले आणि गाडगे बाबांच्या समोर मान खाली घालून दोन्ही हात जोडून 'जी बाबा' म्हणत उभे राहिले. संत काय असतात, गाडगेबाबांची नैतिकता काय होती हे आताच्या तथाकथित भीकारचोट बुवा-बाबांनी आणि सुपारीबाज कीर्तनकारांनी समजून घेतले पाहिजे. गाडगे बाबांच्या डोळ्यातून वीज चमकावी अशा ठिणग्या पडत होत्या. अत्यंत करड्या आवाजात बाबा गरजले. 'भाऊरावजी ग्रँड का म्हून बंद केली'? 'अरे ज्या बहुजन समाजाच्या पोरा-पोरींच्या हातात म्हशीचे शेपटे होते, त्या हातात भाऊरावने लेखणी दिली. भाऊरावची ग्रँड पुन्हा चालू झाली पाहिजे' असे गाडगेबाबा म्हणाले. मुख्यमंत्री खेर थरथरत म्हणाले, 'जी बाबा' आणि गाडगेबाबा तीरासारखे निघून गेले. असा होता आपल्या संत आणि महापुरुषांचा जाज्वल्य संघर्ष. संत आणि महापुरुषांचे हे कॉम्बिनेशन आता आपल्याला कुठेही पाहायला मिळत नाही. सत्ताधाऱ्यांकडून पॉकिट घेऊन कीर्तन करणारे सुपारीबाज कीर्तनकार रात्रंदिवस धर्मांधतेच प्रचंड विष ओकत असताना दुसऱ्या बाजूचे जे कीर्तनकार आहेत ते कुठली भूमिका घ्यायला तयार नाही. मोठे मोठे पॉकिट घ्यायचे आणि आता एक मजला बांधला. यावर्षीच्या कीर्तनात दुसरा मजला होईल. पैशाची गिनती करत राहतात. एकदा रक्त तोंडाला लागले. अर्थात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणतात, 'धन हे गरिबाचे रक्त' सर्वसामान्य माणसांकडून मोठ्या प्रमाणात पैसे घ्यायचे. परंतु आपल्या संतांचा संघर्ष ज्या व्यवस्थेशी होता त्या व्यवस्थेच्या विषयी काहीही बोलायचे नाही. कुठलीही भूमिका घ्यायची नाही. कारण सांगायचे, आम्हाला लोकात जावे लागते तर मग तुम्ही लोकात जाता कशासाठी? स्वतःच्या उदरनिर्वाहासाठी? असे सगळे हे होत असताना काही मोजके लोक मात्र महाराष्ट्रात आजही संत आणि महापुरुषांच्या विचार आणि भूमिका अगदी स्पष्टपणे मांडताना आपल्याला दिसतात. त्यामध्ये सत्यपाल महाराज, शामसुंदर महाराज सोन्नर, ज्ञानेश्वर बंडगर, हरिभक्त परायण दुधे महाराज असे अनेक लोक आहेत. याची दुसरी बाजू अशी आहे की स्पष्ट भूमिका घेतली तर सत्ताधारी हे या महाराजांना नक्षलवादी ठरवतात. त्याचे उदाहरण यावर्षीच्या वारीत शामसुंदर महाराज सोन्नर हे आहे. महाराष्ट्राच्या सर्वोच्च सभागृहात शिंदे गटाच्या मनिषा कायंदे यांनी त्यांच्यावर अर्बन नक्षलवादी असल्याचे आरोप केले आहे. एखाद्या संघटनेने किंवा एखाद्या गटाने अशा पद्धतीचे आरोप करणे ही गोष्ट आपण समजू शकतो. परंतु सरकार पुरस्कृत आणि विधिमंडळात जर इथल्या प्रामाणिक संवैधानिक काम करणाऱ्या लोकांवर अशा पद्धतीचे आरोप केले जात असेल तर ही लढाई लढणे अत्यंत जिकिरीचे झालेले आहे. अशा अत्यंत घातक आणि विकृत मनोवादी व्यवस्थेची लढणारा महायोद्धा म्हणजे रवींद्र पोखरकर होय. . ■ ■



हेमंत टाले
9975807632




# ऐसा भीमा न भूतो न भविष्यते

**'ऐसा भीमा न भूतो न भविष्यते' रमाईने दिधला हा तेजाळविणारा सूर्य. जो झाला कोहिनूर हिरा या दलितांचा. जो लख्ख तेजस्वी असा चमकला पण त्याला गर्व नाही झाला. तो त्या काळात बाहेर देशी शिक्षण घेऊन आला. इथे साहेब म्हणून रुजू झाला. पण, चपरासी त्यांच्या फायली फेकून देऊ लागल्या. दीड दमडीचा हा शिपाई डॉ. बाबासाहेबांच्या टेबलावर फाईल फेकून देऊ लागल्यावर बाबांनी तारली दलितांची व्यथा. ते अशिक्षित यांची किती मानहानी होत असेल? त्यांनी किती अन्याय सहन केले असतील? मूग घेऊन गप्प बसून त्यांनी बुक्क्यांचा मार सहन केला.**

माझीच ही अशी तीहा अशी दैना तर माझ्या अशिक्षित गरीब लेकरांचे काय? त्यांनी का म्हणून अपमान छळ सोसावा? त्यावेळेस दलित म्हणून त्यांना जाणून-बुजून शिक्षणापासून वंचित ठेवले. कारण त्यामुळे कर्मठ बुद्धिवाद्यांचा फायदाच फायदा. कारण, अशिक्षितांना कोणीही यावे आणि फसवून जावे पण, असे वर्तन करताना त्यांना वयाचेसुद्धा भान नसावे?
दलितांना खालच्या दर्जाचे कामे द्यावीत आणि ते सुद्धा एक 'ब्र' शब्द न काढता ती कामे करावी. अगदी निमूटपणे मानहानी सहन करावी. पण का? का तर तो अशिक्षित वर्ग आहे म्हणूनच ना ? म्हणून डॉ. बाबासाहेबांनी याच दलितांना शिक्षणाचा मंत्र दिला. 'शिका आणि शिकवा.' अन्यथा तुमचा इथे निभाव फारच कठीण. म्हणूनच बाबांनी अगदी महत्त्वाची व सक्तीची शिकवण दिली 'शिका आणि शिकवा, काही वाचा तर वाचाल.' नाहीतर तिथे ताठ मानेने जगणेच अशक्य. शिक्षण कुठे वाया जात नाही ते उपयोगीच पडत. बाबांनी त्यांच्या लेकराचे छळ उघड्या डोळ्यांनी पाहिले. तिथे तुझे रक्त लाल आणि माझे लालच मग हा भेदभाव का? मलाही आणि तुलाही दोन हात, दोन कान, दोन डोळे मग भेदभाव का? असमानता का? ही लाचारी कमीपणा त्यांच्याच पदरी का? सारे भोग भोगायचे ते यांनीच पण का?
जे निसर्गाचे देणे आहे. इथेही प्रस्थापित बुद्धिवाद्यांचे या वर्गाचेच वर्चस्व का? आणि त्या निसर्गाने दिलेल्या पाण्यासाठीसुद्धा त्यांच्यापुढे हात पसरावे? जिथे गुरेढोरे न्हायाली जातात. जिथे त्यांना पाणी प्यायला दिले जाते. पण माणसाच्या रूपात असलेल्या दानवा तू माणसासारखा रहा. माणसाला ते पाणी पिण्यासाठी अडवतोस? का; तर ते पाणी बाटेल. पण जे पाणी नैसर्गिक आहे तिथेही हा भेदभाव का? उच्चभ्रू समाजापुढे त्या पाण्यासाठी हात पसरायचे? या पाण्यावर साऱ्यांचा हक्क आहे मग ही असमानता का? तेव्हाच बाबांनी ठरविले जिथे जिथे असमानता आहे तिथे तिथे सत्याग्रहाचे रणशिंग फुंकले. आपण आपले हक्क मिळवूनच राहायचे. ते पण मानाने. तिथे भेदभाव होणार नाही. 'मी हिंदू म्हणून जरी जन्माला आलो तरी मी हिंदू म्हणून मरणार नाही.' ज्यांनी मंदिरे बांधायला हातभार लावला, श्रम केले पण मंदिर पूर्ण बांधून झाल्यावर त्यांना त्याच मंदिरात प्रवेश नाही? त्यांच्याकडून विहिरी खोदून घ्यायच्या. पण त्याच विहिरीला पाणी लागल्यावर मग मात्र ज्यांनी त्या विहिरी खणल्या त्यांना व त्या पाण्याच्या थेंबालाही स्पर्श नाही का? तर ती विहीर बाटेल. हे सारे काही इतके त्रासिक असमानतेचे होते काही विचारू नका. म्हणूनच त्यांनी सत्याग्रहाचे रणशिंग फुंकले. हा लढा मानवा मानवात होता. मानवनिर्मित स्पृश्य अस्पृश्यांचा होता. हे मानव मुक्तीचे, समानतेचे महायुद्ध होते. धर्मसंग्राम होता. क्रांतिवीर लढा होता. विषमतेविरुद्ध पुकारलेले बंड होते. समानतेसाठी पुकारलेली एक ललकारी होती. तो एक भडकाच होता. धर्मातील अनिष्ट चालीरीतीविरुद्ध उभारलेला एक धर्म लढा होता.
चवदार तळ्याचे पाणी चवदार आहे पण ते चाखले तरच समजेल ना? पण ते तळे बाटले म्हणून इथे स्पर्शच नको ते बाटले का? तर, पाण्याला अस्पृश्यांचा स्पर्श होईल. त्या कारणामुळे ठिकठिकाणी सत्याग्रहामुळेच अवघ्या महाराष्ट्रात चैतन्याची ज्योत पेटवली. पण हे सारे होत असताना धम्माला धर्माचे स्वरूप येणार नाही. याची मात्र त्यांनी पूर्ण दक्षता घेतली आणि त्याचबरोबर याची जाण आपल्या समाजाला दिली.




आपला धर्मच असा घडविला तिथे पोटजाती तर सोडाच पण जातही नाही. फक्त धर्मच.
बौद्ध धर्म जिथे फक्त माणुसकी नांदते आणि केवळ धर्म हा माणुसकीचाच. सत्याग्रहाला खूप उधाण यायचे. खेडोपाडी ते सत्याग्रहाचे संदेश पोहोचायचे. मग माणुसकीच्या हक्कासाठी सत्याग्रहाच्या निर्णयाने व नेत्याच्या हाकेने खडबडून जागे झाले. माणुसकीच्या गंगेत आपल्याला तिथे अमृत प्राशन करायला मिळणार निव्वळ या भुकेमुळेच प्रेरित होऊन जसे जमेल तसे लोग येऊ लागले. पण शेवटी पदरी मारहाणच ना! का हा माणूसच, माणसाचा शत्रू बनला? माणुसकीच्या भावानेने सर्व सत्याग्रही सुखावले होते. त्यांच्या रोमारोमात रक्त सळसळत होते. अगदी देहभान विसरून आगेकूच करत होते. ते रामाच्या दर्शनासाठी भुकेले नव्हते तर ते माणुसकीच्या दर्शनासाठी हापापले होते. जणू त्यांना त्यामुळे त्यांचे गेलेले वैभव पुन्हा प्राप्त होणार होते. ती केवळ माणसाची मिरवणूक नव्हती तर माणुसकीचा शोध घेणाऱ्या पुजाऱ्याची होती. ही विषमता सम व्हावी म्हणूनच खूप अभ्यास करून, भारत देशासाठीची राज्यघटना लिहिली. खरेच या भारताची घटना लिहिणारा शिल्पकार असा लाभला तो देश किती नशीबवान आणि त्यात काही मुद्दे आहेत की तिथे थोडे कंगोरे असणारच. पण ही विषमता समसमान होत असेल तर निदान या कालखंडात आता तरी समानता जाणवेल की नाही कुणास ठाऊक? माणुसकीसाठी कुठलाही धर्म, जात, वय नको असते. तिथे फक्त माणुसकीच असते, दुसरे काहीच नाही. असा हा बौद्ध धर्म कुठेही धडाडीने व न्यायानेच लढतो. माणुसकीसाठी लढतो. मग तिथे साहजिकच मारहाण, दगडेक, एक ना दोन खरच या सत्याग्रहींनी खूप सोसले.
आज केवळ आपल्या बाबांमुळेच आपण सुखाच्या आसनावर स्थानापन्न आहोत. या सगळ्या त्रासाला कंटाळून शेवटी बाबांनी ठरविले धर्म परिवर्तन. त्यासाठीसुद्धा त्यांनी धर्मांतर का? यावर लोकांना विचार पटवून दिले आणि त्यांनी धर्मांतराचा इतिहासच घडवला. नागपूर येथे त्यांनी 14 ऑक्टोबर 1956 रोजी सात लाख अनुयायांनी एक साथ धर्मांतर केले व का केले याचेही उत्तर मिळताच त्यांनी इतरांच्या निदर्शनास आणले. धर्मांतर का करावे यासाठी लोकांना समजून त्यांना ते पटले व बाबांचे विचार त्यांनी आत्मसात केले.
धर्मांतर का?
माणूस धर्मासाठी नाही धर्म माणसासाठी आहे. माणुसकी प्राप्त करून घ्यायची असेल तर धर्मांतर करा. संघटना करायची असेल तर धर्मांतर करा. आत्मसन्मान प्राप्त करून घ्यायचे असेल तर धर्मांतर करा. संसार सुखाचा करायचा असेल तर धर्मांतर करा. जो धर्म तुमच्या माणुसकीला किंमत देत नाही, त्या धर्मात तुम्ही का राहता? जो धर्म तुम्हाला देवळात जाऊ देत नाही त्या धर्मात तुम्ही का राहता? जो धर्म तुम्हाला पाणी मिळू देत नाही त्या धर्मात तुम्ही का राहता? जो धर्म तुम्हाला शिक्षण घेऊ देत नाही त्या धर्मात तुम्ही का राहता? जो धर्म तुमच्या नोकरीचे आड येतो. तुमची पदोपदी मानहानी करतो अशा धर्मात तुम्ही का राहता? ज्या धर्मात माणसाशी माणुसकीने वागण्याची मनाई आहे तो धर्म नसून शिरजोरीची सजावट आहे. ज्या धर्मात माणसाची माणुसकी ओळखणे, अधर्म मानला जातो त्या धर्मात तुम्ही का राहता?

सौ. जयश्री सुधीर काटे
मो: 8097406603

संघर्ष सविधानकर्त्याचा
तडजोड कधीच नाही बाबासाहेबांनी केली
सत्त्याशी आणि तत्वाशी
नाहीतर दिसले असते बाबा माझे
भारताच्या प्रधानमंत्री पदी. देऊनी तिलांजली पदाची
खचले गोर गरीबांसाठी. खीचपत पडलेला समाज पडला दृष्टीस
ज्याला ठाऊकही नव्हते, आपण जिवंत आहोत की मुडदे.
अश्या समाजावर तथागत गौतम बुद्धाच्या धम्माची
शिंपडली संजीवनी.
आणि झोपलेला समाज जागा केला.
दिला त्यांना श्वास मोकळा, दिला ज्ञानाचा धडा आणि
दिली तलवार एक धगधगती.
ती होती संघर्षाची मानवतेची आणि समानतेची.
डॉ. बाबासाहेबांनी फोडली डरकाळी,
लढले महाडच्या चवदार तळी.
पण पाण्याची चव घेऊनच तेथून हटले.
कुणाच्याही बाला न घाबरता.
भीम माझा प्याला पाणी वाघावाणी.
तसेच महान थोर योद्धा माझा लढला गोदातीरी.
नाशिकच्या काळाराम मंदिरात समानतेचा
प्रवेश मिळवण्यासाठी.
तो एक होता मुक्तीसंग्राम. एक क्रांतिकारी लढा होता.
अन्याया विरुद्ध न्याय मागण्याचा आणि तोही हक्काने. सारे क्रांतिकारी आगेकूच करत होते, नाशिकच्या दिशेने. एवढी गर्दी होती की मुंगीला शिरायला ही जागा नव्हती. हाक होती डॉ. बाबासाहेबांची आणि त्या हाकेला प्रतिसाद होता त्यांच्या गरीब समाजाचा. अश्या या प्रसंशनीय सत्याग्रहाची नोंद घेतली गेली दाहीदिशा या जगतावरी. भारतात होऊन गेले डॉक्टर अनेक. कुणी ब्रेन चे तर कुणी काळजाचे. पण माझे बाबा होते एक युगपुरुष. फक्त एक आणि एकच की जे डॉक्टर झाले मुडद्यांना जिवंत करणारे. भारत देशाला लागलेल्या जातीयवादी किड्यांना त्यांनी केले नेस्तनाबूत. तसेच 395 कलमाचे इंजेक्शन देऊन जातीयवादाचा कॅन्सर नष्ट करून केले मुक्त भारतास. माझ्या भीमबाबाला नाही गरज सोन्याच्या साजाची ना हिऱ्याची माझे डॉ. बाबासाहेबच आहेत एक लखलखता कोहिनूर हिरा. ते आहेत अत्त दीप भव. माझे भीमबाबा कुणापुढे कधी झुकलेच नाही. समाजासाठी अतोनात झटले पण कधी थकलेच नाही. भीमबाबा माझे इतके शिकले की त्यांचा प्रतिस्पर्धी कुणी झालाच नाही. तरी भीमबाबा माझे गाजवतात अधिराज्य अब्जावधी लोकांच्या हृदयावरी. ते आहेत एक विश्वकोश हे सांगण्याची गरजच नाही. हा इतिहासच कथीतो त्यांची विद्वत्ता आणि माणुसकी. धम्म त्यांचा माणुसकीचा आणि शांततेचा ऐसा भीमा न भूतो न भविष्यती म्हणूनच आहेत डॉ. बाबासाहेब श्रद्धास्थान माझे. नतमस्तक होऊन करते त्रिवार वंदन! मी भिम स्मृतीला आणि त्यांच्या महानकिर्तीला. ■ ■

